**निर्णायक लढ्याची गरज**
कामगार आणि कर्मचारी वर्गाचे खच्चीकरण करण्याचे धोरण सरकारचे असून त्याविरोधात कामगार व कर्मचारी संघटनांनी एकत्र येऊन निर्णायक लढा देण्याची गरज असल्याचे रोखठोक मत कामगार नेते सचिन अहिर यांनी मांडले आहे.

(सविस्तर मुलाखत पान ८)


# कर्मचारी टाइम्स

शासकीय कर्मचाऱ्यांचा हितरक्षक कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, जुलै २०२३ • वर्ष - १, अंक ६ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त.
शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.
Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India.
www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com


'कर्मचारी टाइम्स'
KARMACHARI TIMES!
ALL-IN-1 QR CODE
वर्गणीदार व्हा...

## शासकीय कर्मचाऱ्यांची घरांची तरतूद रद्द

**मुंबई :** लोकप्रतिनिधी, राज्य सरकारी, केंद्र सरकारी आणि म्हाडा कर्मचारी अत्यल्प गटात मोडत नसल्याने त्यांच्यासाठी गृहप्रकल्पात असलेले ११ टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांसह लोकप्रतिनिधींना म्हाडाच्या गृहसोडतीत असलेले अत्यल्प गटातील ११ टक्के आरक्षण रद्द करून ते अत्याचार पीडित महिला, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक आणि असंघटित कामगारांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडाच्या मुंबई मंडळाने राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. म्हाडा सोडतीच्या निकषांत अनेक वर्षे बदल न झाल्याने २०१२-१३ मध्ये माजी लोकायुक्त सुरेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने १८ डिसेंबर २०१४ मध्ये एक अहवाल सादर केला. मात्र म्हाडाने २०२२ पर्यंत त्याकडे दुर्लक्ष केले. पण आता अहवालातील काही शिफारशी लागू करण्याच्या दृष्टीने म्हाडाने पावले उचलली आहेत. त्यानुसार अत्यल्प गटात म्हाडा कर्मचारी, लोकप्रतिनिधी, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी असलेले दोन टक्के आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठीचे पाच टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रवर्गातील अर्जदार अत्यल्प गटात बसत नसल्याने या घरांसाठी अर्ज येत नाहीत. परिणामी घरे रिकामी राहातात. या प्रवर्गासाठी अर्ज न आल्यास ही घरे सर्वसामान्य प्रवर्गातील अर्जदारांना खुली करून त्यानुसार सोडत काढली जात आहे. आमदार-खासदारांसाठी अत्यल्प गटात असलेल्या आरक्षणावरून टीका होते. सोडतीच्या वेळी रिकामी राहणारी ही राखीव घरे सर्वसामान्यांसाठीच्या सोडतीत आणावी लागतात. त्यामुळे म्हाडाने अत्यल्प गटातील हे आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. लोकप्रतिनिधींचे आरक्षण रद्द करतानाच म्हाडा आणि केंद्र-राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठीचे आरक्षणही रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मुंबई मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या चारही प्रवर्गाचे एकूण ११ टक्के आरक्षण रद्द करून सुरेशकुमार समितीच्या शिफारशीनुसार त्याजागी इतर गरजूंना आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

म्हाडा सोडतीतील अत्यल्प उत्पन्न गटात लोकप्रतिनिधी, म्हाडा कर्मचारी तसेच केंद्र आणि राज्य सरकार कर्मचाऱ्यांसाठी एकूण ११ टक्के आरक्षण आहे. मात्र, या प्रवर्गातील कोणीही अत्यल्प उत्पन्न गटात मोडत नसल्याने ही घरे रिकामी राहतात आणि नंतर इतर प्रवर्गाकडे वळवावी लागतात. त्यामुळे आता हे ११ टक्के आरक्षण रद्द करण्यात येईल.

## महागाई भत्त्यासाठी ५ जुलैला उग्र निदर्शने

**मुंबई :** १ जानेवारी, २०२३ पासून केंद्रिय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४% वाढ केली आहे. केंद्र सरकारप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहा महिने उलटले तरी महागाई भत्त्यात वाढ देण्यात आलेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, सदर महागाई भत्ता त्वरित न दिल्यास बुधवार दि. ५ जुलै, २०२३ रोजी दुपारी १ वा. मंत्रालयाच्या आरसा गेटसमोर उग्र निदर्शने करण्याचा इशारा राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना पत्राद्वारे दिला आहे.

केंद्रीय कर्मचारी व सेवानिवृत्तांना महागाई भत्ता ३८% वरून ४२% झाला आहे. केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढ राज्यात देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. सदर पत्राच्या प्रती सहकार्याच्या विनंतीसह मुख्य सचिव तसेच अपर मुख्य सचिव (वित्त) यांनाही देण्यात आल्या आहेत.

## जुनी पेन्शन योजना समितीची मुदत संपुष्टात; आता प्रतिक्षा अहवाल अन् कार्यवाहीची !

**मुंबई :** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपाबाबत तडजोड करत शासनाने अभ्यास समितीची स्थापना केली. या समितीची मुदत संपली असून आता त्यांचा अहवाल सादर व्हावा आणि लवकरच शासनाकडून जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, यासाठी सरकारने पावले उचलावीत, अशी अपेक्षा कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

याबाबत राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर आणि राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याप्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. या समितीपुढे कर्मचारी समन्वय समितीने आपले मुद्दे अत्यंत प्रभावीपणे सादर केले तसेच त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होणे शासकीय पातळीवर कसे फायदेशीर आहे, याचे महत्व समजावून दिले. त्याची सकारात्मक दखल समितीने घेतली आहे. त्यामुळे याबाबत शासन सकारात्मक असल्याचा संदेश कर्मचारी वर्गामध्ये गेला आहे.

राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर दाखल झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी तुलनात्मक अभ्यास या समितीकडून करून त्याचा अहवाल शासनास सादर होणे अपेक्षित आहे. नव्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत कर्मचारी व अधिकारी यांचे दहा टक्के व शासनाचे १४ टक्के अंशदान दर महिना जमा केले जातात. निवृत्तीनंतर जमा होणाऱ्या निधीवर निवृत्तीवेतन देण्याची शासनाची योजना आहे. पण ३०-३५ वर्षे सेवा करून निवृत्त झाल्यानंतर नेमके किती निवृत्तीवेतन मिळणार याबाबत कोणतीही ठोस तरतूद यात नाही, त्यामुळे नवीन निवृत्तीवेतन योजना सरसकट रद्द करून सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जुनी योजना लागू करण्यात यावी, अशी कर्मचारी व संघटनांची मागणी आहे. त्यासाठी १४ ते २० मार्च २०२३ दरम्यान या शासकीय कर्मचाऱ्यांनी संपदेखील पुकारला होता. त्याची दखल घेत शासनाने ही समिती स्थापन केली आहे. या योजनेबाबत इतर राज्यांमधील सरकारच्या वतीनेदेखील सकारात्मक भूमिका घेत तिथल्या राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्रात ही योजना अद्यापही लागू झालेली नाही. त्यामुळे कर्मचारी वर्गात कमालीची अस्वस्थता आहे.

शासनाने नेमलेल्या या समितीची मुदत आता संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता अधिक वेळ न दवडता समितीने शासनाला लवकरात लवकर अहवाल सादर करावा, त्याचबरोबर या अहवालाच्या शिफारसीदेखील शासकीय स्तरावरून कुठल्याही प्रकारे वेळ न दवडता लागू करण्यात याव्यात, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. जुन्या पेन्शनच्या मुद्याबरोबरच शासकीय कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असून त्यांचीदेखील सोडवणूक लवकरात लवकर व्हावी, त्यासाठी शासनाने संवेदनशील व्हावे, असे आवाहनदेखील कर्मचाऱ्यांचे नेते भाऊसाहेब पठाण यांनी केले आहे.

## वैद्यकीय अधिकारी तीन महिने वेतनाविना

**गुहागर :** जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या योजने अंतर्गत सर्वत्र बोलबाला चालू आहे. मुख्यमंत्री नुकतेच जिल्ह्याला येऊन गेले. सर्व जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेशही देऊन गेले. मात्र जनतेची सेवा करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना असलेले अल्प मानधन ही समस्या कधी सूटणार ? याबाबत जनतेतून चर्चा होत आहे. शासन वेगवेगळ्या योजनेंतर्गत कोट्यावधींचा निधी 'येनकेन प्रकारेन' जनतेवरती खर्च करत असते. मात्र जनतेला सेवा देणाऱ्या जिल्ह्यातील ९० वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन तब्बल ३ महिने न मिळाल्याने हे वैद्यकीय अधिकारी आर्थिक संकटात सापडले आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सेवा देणाऱ्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी एप्रिल २०२३ पासून मानधनाविना आहेत. वेतनासाठीचे अनुदान न आल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांचे ३ महिन्यांपासून वेतन रखडले आहे. कोरोनाच्या अडचणीच्या काळात त्यांनी चांगल्याप्रकारे कामगिरी केली होती. या कोविड योद्धयांवर आज ही वेळ आली आहे. जिल्ह्यातील ९० तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांची आता आर्थिक कोंडी झाली तरी कर्तव्य करत ते सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. यामुळे पगार मिळण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, त्यांची ११ महिन्यांची तात्पुरती नियुक्ती असल्याने नोकरी कधीही गमावण्याची कायम भीती आहे. तरीदेखील ते प्रामाणिकपणे सेवा बजावत आहेत. त्यांना कोणतीही वेतनवाढ अथवा भत्ता दिला जात नसल्याचे विदारक सत्य आहे. लसीकरण केंद्र आदींना वारंवार भेटी द्याव्या लागतात. त्यामुळे त्यांना किमान प्रवासभत्ता तरी मिळावा अशी त्यांची मागणी आहे. त्याकडेही शासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. वेतनाचे अनुदान शासनाकडून अद्याप न आल्याने वेतनाचा प्रश्न अडकून पडला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मानधनासाठी शासनाकडून अनुदानच आलेले नाही. त्यांच्या मानधनासाठी लागणाऱ्या अनुदानाची रक्कम मिळावी त्यासाठी प्रत्येक महिन्याला आमच्याकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. कोरोना काळात जीव धोक्यात घालून काम केले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी पदावर एमबीबीएस पदवीधर उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या जागी बीएएमएस पदवीधर नियुक्त करण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार सप्टेंबर २०१९ पासून जिल्हामध्ये ९० तदर्थ वैद्यकीय अधिकारी काम करत आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील आरोग्यव्यवस्थेचा भार हा मोठ्या प्रमाणावर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्यावर आहे. तदर्थ वैद्यकीय अधिकारी हे नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणेच सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

कोविडच्या महामारीमध्ये सर्व तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांनी आपला जीव धोक्यात घालून रुग्णसेवा दिली. त्यामुळे त्यांचा 'कडा' म्हणून सन्मानही करण्यात आला होता. एवढी मोठी जबाबदारी पार पाडली असतानाही त्यांना केवळ ४० हजार मानधनावर काम करावे लागत आहे. तुटपुंजा मानधनावर काम करताना त्यांना आर्थिक व पर्यायाने कौटुंबिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

## कंत्राटी ग्रामसेवकांचे मानधन वाढविले

**मुंबई :** कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या या ग्रामसेवकास सहा हजार रुपये ऐवजी आता १६ हजार रुपये मिळतील.

राज्यात सध्या २७ हजार ९२१ ग्रामपंचायती असून १८ हजार ६७५ नियमित ग्रामसेवकांची पदे आहेत. त्यापैकी १७ हजार १०० पदे भरली असून १५७५ पदे रिक्त आहेत. वर्ष २००० पासून ग्रामसेवकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतात. कृषी सेवक, ग्राम सेवक, शिक्षण सेवक यांच्या मानधनात वाढ झाल्यामुळे कंत्राटी ग्राम सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव होता. यासाठी १ कोटी ५७ लाख ५० हजार रुपयांचा आर्थिक भार पडेल.

## राज्य शासनातील पदांवर अतिक्रमण

**मुंबई :** राज्य शासनाने शासनाच्या विभागांतील विहित पदांवर अखिल भारतीय इतर सेवांतील (भा.प्र.से. व्यतिरिक्त) कोणत्याही सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करु नयेत, तसेच सद्य:स्थितीतील अशा सर्व प्रतिनियुक्तींवरील नेमणुका तातडीने रद्द कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने केली आहे.

शासनाच्या धोरणांच्या अंमलबजावणीत सुसूत्रता असावी; निधीचा सुयोग्य विनियोग व्हावा, यासाठी राज्य शासनातील मंत्रालयासह विविध प्रशासकीय विभाग, तसेच राज्य शासनाची महामंडळे, उपक्रम, कंपन्या, महानगरपालिका आदी ठिकाणच्या विविध पदांवर राज्य शासनातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जातात. अशा पदांवर संबंधित विभागांतर्गत संवर्गांतीलच अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या होणे अपेक्षित असून त्याकरीता अधिकाऱ्यांना संबंधित कामकाजाचे आवश्यक ज्ञान आणि विहित प्रशिक्षण देण्यात आलेले असते.

सद्य:स्थितीत, राज्य शासनातील सर्वच विभागांत विहित समय मर्यादेत पदोन्नत्या होत नसल्याने बहुतांश वरिष्ठ पदे रिक्त राहिली आहेत. तशातच राज्य शासनातील प्रशासकीय विभागांतील राज्य शासकीय राजपत्रित अधिकाऱ्यांच्या अशा विहित पदांवर अखिल भारतीय इतर सेवांतील (भा.प्र.से. व्यतिरिक्त) अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणुका होण्याचे वाढते प्रमाण, ही बाब चिंताजनक आहे. माहिती व जनसंपर्क संचालनालय, पर्यटन विकास महामंडळ, महापालिका, इत्यादी विभागांत राज्यसेवेतील राजपत्रित / भा.प्र.से. व्यतिरिक्त अखिल भारतीय इतर सेवांमधील अधिकाऱ्यांच्या नेमणुकांमुळे राज्य शासनातील अधिकाऱ्यांच्या संधी हिरावून घेतल्या जात आहेत.

राज्य शासनाने या असंतोषाची तातडीने दखल घेऊन, राज्य शासनाच्या विभागांतील विहित पदांवर अखिल भारतीय इतर सेवांतील (भा.प्र.से. व्यतिरिक्त) कोणत्याही सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करु नयेत, तसेच सद्यस्थितीतील अशा सर्व प्रतिनियुक्तींवरील नेमणुका तातडीने रद्द करुन, ज्येष्ठ अधिकाऱ्यांना सदर पदांवर नियुक्ती द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार श्री. ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच दुर्गा महिला अध्यक्ष डॉ. सोनाली कदम अर्थमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## बदल्यांसाठी 'ॲप' चा वापर

**मुंबई :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या इतिहासात प्रथमच संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून २,४७१ गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदलीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. सदर प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करण्यात आली. त्यासाठी विशेष ऑनलाईन ॲप तयार केले होते. ९२ टक्के कर्मचाऱ्यांना पसंती क्रमांकानुसार मोबाईलवर बदली आदेश देण्यात आले आहेत.

या ॲपमध्ये संबंधित आरोग्य संस्थांकडून कर्मचाऱ्यांचे कार्यरत ठिकाण आणि रिक्त पदांची माहिती भरण्यात आली होती. बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता सूचीची माहिती मिळण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे बदली 'ॲप'च्या माध्यमातून पारदर्शक भरती प्रक्रिया, राबविणे शक्य झाले असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

## कामगारांसाठी माध्यान्ह भोजन योजना

### कामगार उपायुक्त विभागाचा उपक्रम, जिल्ह्यात ४७ हजार लाभार्थी

**पालघर :** राज्य सरकारने 'शासन आपल्या दारी' योजनेतून प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. पालघर जिल्ह्यात कामगार उपायुक्त कार्यालयाने या योजनेतून दीड महिन्यात सुमारे ४७ हजारांहून अधिक कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. त्यात माध्यान्ह भोजन योजना, विविध साहित्याचे वितरण, आरोग्य तपासणी आदींचा समावेश आहे. त्यामुळे या उपक्रमात या विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

कामगार उपायुक्त कार्यालयातर्फे स्थलांतरित कामगार तसेच बांधकाम कामगारांसाठी माध्यान्ह भोजन योजना सुरू केली आहे. या अंतर्गत नोंदणीकृत कामगारांना दुपारच्या जेवणात पोळी, भाजी, डाळ, भात, गूळ व इतर



पदार्थ, असा चौरस आहार दिला जात आहे. कामगार उपायुक्त कार्यालयाने पालघर, डहाणू, विक्रमगड, वाडा व वसई तालुक्यांत सुमारे ४६ हजार कामगारांना या योजनेचा लाभ मिळवून देत जिल्ह्यातील लाभार्थी संख्येत अग्रक्रम पटकावला आहे.

त्याचबरोबर ४५९ कामगारांना संरक्षणात्मक बूट, मास्क, श्रवण संरक्षण, हेल्मेट, ग्लोज, सेफ्टी हार्नेस, रिफ्लेक्टर जॅकेट, अशा सुरक्षा संच तसेच प्लास्टिकची चटई, मच्छरदाणी, सोलर टॉर्च, जेवणाचा डबा, पाण्याची बाटली, खांद्यावरील बॅग, पत्र्याची पेटी, असा संचही वितरित केला आहे. या विभागाच्या कल्याणकारी योजनेंतर्गत शैक्षणिक मदत योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना आरोग्यविषयक योजना, आर्थिक साहाय्य योजना व आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

**नोंदणीसाठी पात्रता :** १८ ते ६० वयोगटांतील बांधकाम कामगार व वर्षभरात ९० दिवसांपेक्षा अधिक काम, बांधकाम, 'मनरेगा', वीट भट्टीवर केलेले काम, वयाचा पुरावा, ९० दिवस काम केल्याचे पुरावा पत्र, रहिवासी पुरावा, फोटो ओळखपत्र पुरावा, बँक खाते पुस्तिका, पारपत्राची नक्कल प्रत, मोबाइल क्रमांक, मनरेगा कामगार असल्यास 'जॉब कार्ड' दाखवून ह्या योजनेचा लाभ घेता येतो.

**विविध कल्याणकारी योजना**

**शैक्षणिक मदत :** नोंदणीकृत कामगाराच्या शालेय उपस्थितीबाबत, दहावी व बारावी इयत्ता उत्तीर्ण झाल्यास प्रोत्साहनपर भत्ता, शैक्षणिक साहाय्य, पदवी-पदविका उत्तीर्ण झाल्यास प्रोत्साहन साहाय्य, शैक्षणिक साहित्य अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणासाठी मदत, संगणक शिक्षणासाठी मदत

**सुरक्षा व अन्य योजना :** विवाहासाठी अर्थसाहाय्य, पंतप्रधान श्रम योगी योजना, पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, कामगारांसाठी सुरक्षा संच, कामगारांसाठी आवश्यक वस्तूंचा संच, कामगारांच्या पूर्ण शिक्षण कामगारांसाठी माध्यान्ह भोजन, कामगाराच्या एका मुलीसाठी विवाहासाठी अर्थसहाय्य

**आरोग्यविषयक :** महात्मा फुले जन आरोग्य योजना, गंभीर आजारासाठी वैद्यकीय साहाय्य, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत, स्त्री बांधकाम कामगारांसाठी किंवा पुरुष लाभार्थ्यांच्या पत्नीसाठी नैसर्गिक प्रसूतीसाठी साहाय्य, आरोग्य तपासणी, अपघातात अपंगत्व आल्यास कृत्रिम अंग जोडण्यासाठी साहाय्य.

**आर्थिक साहाय्य :** हॉटेल बांधकाम कामगार आवास योजना, घर खरेदीसाठी गृह कर्जावर सवलत, कामावर मृत्यू झाल्यास वारसाला मदत, नैसर्गिक मृत्यू झाल्यास वारसाला अर्थसाहाय्य.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येत आहे. त्यातून ४७ हजार कामगारांपर्यंत शासन त्यांचे हक्क आणि लाभ पोहचवणार आहे. याबाबत यापूर्वी कामगारांकडून अशाप्रकारच्या उपक्रमांची मागणी होऊनदेखील त्याची दखल घेतली गेली नव्हती. पण आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने तत्काळ या निर्णयाला लागू करण्याची कार्यवाही केल्यामुळे कामगार वर्गामध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे. तसेच यापुढील काळातदेखील कामगारांच्या मागण्या शासनाकडून मान्य होतील, अशी आशा व्यक्त होत आहे.

## २ लाख कर्मचारी पाच महिन्यांत बेकार

**नवी दिल्ली :** जगभरात यावर्षी विविध क्षेत्रांमध्ये तब्बल दोन लाख कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यात आले आहे. त्यात टेक कंपन्यांमधील कपात जास्त आहे. हा आकडा येणाऱ्या काळात आणखी वाढणार आहे. यामुळे रोजगाराची अपेक्षा असणाऱ्यांच्या पदरी मोठी निराशा पडली आहे.

मेटा, बीटी, व्होडाफोन यांच्यासह अनेक कंपन्यांनी कपातीची योजना जाहीर केली आहे.आतापर्यंत गेल्या वर्षभरात ३.६० लाख कर्मचाऱ्यांनी नोकऱ्या गमावल्या आहेत. जगभरात जानेवारी - डिसेंबर २०२२ या कालावधीत १ हजार ४६ कंपन्यांनी कपात केली. त्यांनी १.६१ लाख कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले. तर यावर्षी २ लाख कर्मचारी कमी केले आहेत.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये भ्रष्टाचार

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा आरोप

**मुंबई :** मुंबई राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू आहे. कृषी साहाय्यक पदासाठी तीन लाख रुपयांचा दर सुरू आहे. वन विभागातही बदल्यांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. काही ठराविक आमदारांना बदल्यांचे अधिकार देण्यात आल्याचा आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केला.

वन विभागाच्या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. बदल्यांचे अधिकार असले तरी मंत्रालयातून आलेल्या यादीमधील आदेश पाळावेत असे तोंडी आदेश असल्याचे सांगण्यात येत आहे. काही जण परदेशात गेले आहेत. बदल्या होणे आणि त्यांनी परदेशात जाणे हा योगायोग आहे का, हा एक संशोधनाचा भाग आहे, असा टोला पवार यांनी वनमंत्र्यांना उद्देशून लगावला. माजी खासदार राजू शेट्टी यांनीसुद्धा दरपत्रक मुख्यमंत्री व राज्यपाल यांना पाठवले होते. काही ठरावीक आमदारांना बदल्यांचे अधिकार देण्यात आले आहेत. या आमदारांनी सुचविलेल्या बदल्या करण्याचे आदेशच जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. लाखो-करोडो रुपये देऊन आलेले अधिकारी प्रामाणिकपणे काम कसे करू शकतील. शासन आपल्या दारी आणले आणि शासनाला कुठे नेले तरीदेखील शासकीय



अधिकाऱ्यांची मानसिकता बदलल्याशिवाय 'शासन आपल्या दारी' ही फसवणूक चालली आहे ती थांबणार नाही, असे मतही पवार यांनी व्यक्त केले.

राज्यात मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी सुरू असून कोट्यवधी रुपये जाहिरातीवर उधळले जात आहेत. एक वेळ केलेल्या कामाची जाहिरात करणे समजू शकतो पण शासनाने न केलेल्या कामाच्या खोट्या जाहिराती दाखवून जनतेची फसवणूक करण्याचे काम विद्यमान सरकारच्या वतीने चालू आहे, अशी टीका पवार यांनी केली.

पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभारावर टीका केली. माजी मुख्यमंत्री अंतुले यांच्या काळात संजय गांधी निराधार योजना सुरू झाली. त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक सरकारने ही योजना सुरू ठेवली. कोणीही ही योजना बंद केली नाही. आपल्या जाहिराती योग्यपद्धतीने का दाखवल्या जात नाहीत, हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी पाहावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

## प्रशासनाला महिलांचा निर्वाणीचा इशारा

**चंद्रपूर :** मागील वर्षी भद्रावती तालुक्यातील पिपरी (देश) येथे मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. ही स्थिती वेकोलिच्या ढिगाऱ्यामुळे झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या पुरामध्ये गावातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. नुकसानीनंतर लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांनी गावाला भेट देत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. मात्र, वर्ष लोटत असतानाही काहीच उपाययोजना झाल्या नाही. त्यामुळे आता गावातील नागरिकांसह महिलाही एकवटल्या असून त्यांनी गावात बैठक घेत शासन तसेच प्रशासनाला निर्वाणीचा इशारा दिला असून आंदोलनाची तयारी सुरू केली आहे.

## तहसीलदार, उपजिल्हाधिकारी सहा महिने नियुक्तीच्या प्रतिक्षेत

**मुंबई :** महसूल विभागाशी संबंधीत राज्यातील नव्वद तहसीलदार उपजिल्हाधिकारी सहा महिन्यांपासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे हे अधिकारी वेतनापासूनही वंचित आहेत.

महसूल विभागातील हे अधिकारी इतर विभागांमध्ये प्रतिनियुक्तीवर होते. यामधील काहीजण मंत्री कार्यालयातही होते. परंतु, मंत्रीमंडळ विस्तार होत नसल्यामुळे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी आपल्या मूळ विभागात आले आहेत. तसेच काहीजण विविध जिल्ह्यांमधून आले आहेत. तेसुद्धा आता नियुक्ती आणि वेतनाच्या प्रतीक्षेत आहेत. बदल्या आणि नियुक्त्यांची मोसमातही या अधिकाऱ्यांना मंत्रालयाच्या पाचव्या मजल्याकडे डोळे लावून बसावे लागले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एमएमआरडीए अंतर्गत विविध विकासकामे सुरु आहेत. संबंधित कार्यालयातील अनेक समकक्षपदे रिक्त आहेत. नैनाचे उपजिल्हाधिकारी पद अनेक दिवसांपासून रिक्त आहे. अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरली जात नाहीत. सध्या त्यांना वेतन नाही. नियुक्ती झाल्यावर मागील वेतन मिळणार असले तरी सध्या कसरत करावी लागत आहे.

## आदेशानंतर शिक्षक अवघड क्षेत्रातच कार्यरत

**चंद्रपूर :** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाइन बदली पोर्टलद्वारे एक ते सहाव्या टप्प्यातील ६४५ शिक्षकांच्या बदल्या यापूर्वीच झाल्या. यातील ५२० शिक्षक शाळेत रुजू झाले. मात्र, सहाव्या टप्प्यातील १२५ शिक्षकांनी बदली प्रक्रियेच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. या शिक्षकांच्या याचिकेवर सुनावणी झाली असून, या शिक्षकांच्या बदलीचे आदेश निघाले आहे. त्यामुळे आता या शिक्षकांना अवघड क्षेत्रातच आपले कर्तव्य बजवावे लागणार आहे. मात्र यामुळे आता बदलीसाठी धडपड करणाऱ्या शिक्षकांची मात्र या निर्णयामुळे निराशा झाली आहे.

## कंपनी कायदा न्यायाधिकरण खंडपीठ देण्याची मागणी

**नागपूर :** पक्षकार व वकिलांच्या सुविधेसाठी आणि न्यायदान वेगवान होण्यासाठी नागपूरमध्ये कर्ज वसुली अपिलीय न्यायाधीकरण, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण व राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे खंडपीठ स्थापन करा, अशी मागणी हायकोर्ट बार असोसिएशन ऑफ नागपूरच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे.

नागपूरमध्ये कर्ज वसुली न्यायाधीकरण कार्यरत आहे. परंतु, या न्यायाधिकरणच्या आदेशाविरुद्ध कर्ज वसुली अपिलीय न्यायाधिकरणात अपील दाखल करण्यासाठी मुंबईला जावे लागते. त्यामुळे पक्षकारांना मनस्ताप व आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. परिणामी, अनेकजण अपील दाखल करीत नाहीत. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधीकरणही मुंबईतच आहे. केंद्रीय कॉर्पोरेट मंत्रालयाला सुरुवातीस हे न्यायाधीकरण नागपूरमध्ये स्थापन करायचे होते. ते मुंबईला स्थापन केले. राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग नवी दिल्ली येथे असून, या आयोगातील तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे, असे संघटनेचे म्हणणे आहे.

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी आवाहन

**ठाणे :** सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, अभियांत्रिकी व वैद्यकीय इ. अभ्यासक्रमाअंतर्गत ६०३ पेक्षा जास्त गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

हे अर्ज जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहिर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, ५ वा मजला, कोर्टनाका, ठाणे पिन ४००६०१ (दूरध्वनी २५३८८४९३), येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत ८ जुलै २०२३ पर्यंत सादर करावेत. असे जिल्हा व्यवस्थापक वंदना राणे यांनी कळविले आहे.

## जयश्री सांगळे यांचा हृद्य सत्कार



**मुंबई :** कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग या ठिकाणी कार्यरत असलेल्या वरिष्ठ लिपिक जयश्री डी. सांगळे यांची कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई अंतर्गत अधीक्षक आमदार निवास, उपविभाग, मुंबई येथे पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष विश्वास रणदिवे, कार्याध्यक्ष विजय कनोजिया व पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेच्या वतीने त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

आपल्या कार्यकाळात जयश्री सांगळे यांनी उत्तम कामगिरी करत कर्मचारी वर्गाशी नेहमीच सलोखा ठेवला, तसेच त्यांच्या प्रश्नांविषयीही त्यांना सहानुभूती देखील आहे.

## चिमुकल्यांनी उपाशी बसून मिळवले शिक्षक

**नांदेड :** विद्यार्थीसंख्येनुसार शिक्षकांची पदे भरावीत यासह गणित, इंग्रजी विषयांना शिक्षक द्यावेत, या मागणीसाठी शाळेच्या पहिल्याच दिवशी मरखेल शाळेच्या विद्यार्थ्यांनी नांदेडमध्ये जिल्हा परिषदेच्या सीईओंच्या दालनासमोर ठिय्या मारला. विद्यार्थी चार तास उपाशीपोटी बसले आणि शिक्षकांची नियुक्ती झाल्यानंतरच त्यांनी आंदोलन मागे घेतले.

प्रशासनाकडे शिक्षकांची मागणी करूनही कारवाई न झाल्याने शाळेच्या पहिल्याच दिवशी ४० विद्यार्थ्यांनी थेट नांदेड गाठले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर यांच्या दालनासमोर ठिय्या मांडला.

## माथाडींच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक : शंभूराज देसाई

**मुंबई :** माथाडी कामगारांना मुंबईतील दवा बाजार, लोहार चाळ या परिसरात वाहतुकीच्या संदर्भात अनेक अडचणी येतात. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका व गृह विभागाने पुढील आठवड्यात संयुक्त बैठक घेवून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, असे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. माथाडी कामगारांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक तसेच संवेदनशील असल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी यावेळी भर दिला.

मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली माथाडी कामगार संघटनेच्या वाहतुकीच्या संदर्भातील मागण्यांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नांची चर्चा करण्यात आली. मंत्री देसाई यांनी यावेळी माथाडी कामगार संघटनेच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेतले. पार्किंग, हातगाडी वाहतुकीचे नियम व अटी याबाबत चर्चा केली तसेच त्यावरील उपाययोजनांबाबतही मते ऐकून घेतली.

या बैठकीस सह पोलिस आयुक्त प्रविणकुमार पडवळ, पोलीस उपायुक्त (वाहतूक) गौरव सिंह, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त उ.बा.चंदनशिवे, माथाडी कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सेवाज्येष्ठ शिक्षकांना प्रशासकीय अधिकार

**सिल्ली :** झालेल्या सभेचा आढावा घेण्यासाठी १४ जून रोजी शिक्षणाधिकारी संजय डोलीकर यांच्या कक्षात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. यात मुख्याध्यापकांना पुढील आदेशापर्यंत मान्यता देण्याचे आश्वासन संघटनेला देण्यात आले. मुख्याध्यापक पद मान्य नसलेल्या शाळेतील सेवाज्येष्ठ शिक्षकाला तीन किंवा सहा -सहा महिन्यांचे आर्थिक व प्रशासकीय अधिकार देण्यात येत असल्याने वारंवार मान्यतेसाठी कार्यालयाच्या खेपा माराव्या लागतात. सेवाज्येष्ठ शिक्षकांना आता आर्थिक व प्रशासकीय अधिकार देण्याचे आश्वासन शिक्षणाधिकारी संजय डोर्लीकर यांनी संघटनेला दिले.

## मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन संपन्न

**मुंबई :** जागतिक वर्धापन दिनानिमित्त मुंबई पोर्ट प्राधिकरणाने ५ जून २०२३ रोजी रे रोड येथे वृक्षारोपण प्रकल्पाचे उद्घाटन केले.

याप्रसंगी मुंबई पोर्टचे चेअरमन श्री. राजीव जलोटा यांनी उपस्थित सर्वांना पर्यावरणाची शपथ देऊन, मार्गदर्शन करताना सांगितले की, मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्यास प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. आम्ही मुंबई पोर्टच्या मोकळ्या जागेवर वृक्षारोपण करीत आहोत. या कार्याला एचडीएफसी व महिंद्रा पाठिंबा देत आहे. पथनाट्यद्वारे वृक्षारोपण कार्यक्रमाचे महत्त्व सांगण्यात आले. हरित दूरदृष्टीवर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी एचडीएफसीच्या प्रमुख अशीमा भट्ट व नसरत पठाण उपस्थित होते. महिंद्राच्या जनरल मॅनेजर स्वाती श्रीवास्तव म्हणाल्या की, वृक्षारोपणाची संधी दिल्याबद्दल आम्ही मुंबई पोर्टला शाबासकी देतो. मुंबई पोर्टने ११ हजार झाडे लावण्यासाठी १० जागा निश्चित केल्या आहेत. अशिमा भट्ट यांनी वृक्षारोपण, पर्यावरण व एचडीएफसीच्या कार्याचे महत्त्व समजून सांगितले. मुंबई पोर्ट कॉर्पोरेट स्तरावर वृक्षारोपण करणार असून, मेंटेनन्सबाबत वाय फोर डी (Y4D) यांचे सहकार्य घेतले जाईल. याप्रसंगी वाय फोर डी (Y4D) चे संस्थापक प्रफुल्ल निकम यांनी मार्गदर्शन केले.

## कोल्हापूर मनपात पूर्णवेळ प्रशासक हवा

**कोल्हापूर :** महानगरपालिकेत पूर्णवेळ प्रशासकांची नेमणूक करावी अशी मागणी आमदार जयश्री जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

कोल्हापूर महानगरपालिकेचे सभागृह सध्या अस्तित्वात नसल्याने, नगरसेवकांचे अधिकार संपुष्टात आलेले आहेत. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक म्हणून आयुक्त पाहत होते. कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांची २ जून २०२३ रोजी पुणे येथे बदली झाली. मात्र, गेल्या पंधरा दिवसानंतरही नवीन प्रशासक नियुक्ती करण्यात आलेली नाही.

## कामगारांचा परवाना निलंबन विरोधात निषेध

**मुंबई :** मुंबईच्या जहाज मंत्रालय महासंचालकांकडून नाविक कामगारांच्या मृत्यूच्या कारणास्तव अँग्लो ईस्टर्न शिपिंग मॅनेजमेंटच्या परवान्याचे निलंबन करण्यात आले आहे. या सुरू असलेल्या चौकशीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. नुसी (NUSI) चे या तपास प्रक्रियेला पूर्णपणे समर्थन आहे, परंतु भारतीय खलाशांच्या २० हजाराहून अधिक रोजगाराला धोका निर्माण होणार असल्यामुळे आम्ही हे कधीही सहन करणार नाही, असे या कामगारांचे म्हणणे असून तसे व्यवस्थापनास कळविण्यात आले आहे.

दरम्यान, याबाबत त्वरित योग्य ती कार्यवाही न झाल्यास आंदोलन करण्याच्या मन:स्थितीत हे सर्वजण आहेत.

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय तसेच आयुष मंत्रालयाचे कॅबिनेट मंत्री मा. श्री. सर्बानंद सोनोवाल यांनी या प्रकरणाची दखल घ्यावी, अशी विनंती नुसीने केली आहे. याव्यतिरिक्त डायरेक्टर जनरल शिपिंगचे महासंचालक श्री. राजीव जलोटा यांना वरील प्रकरणाबाबत १ जून २०२३ रोजी पत्रव्यवहार केला आहे. आमच्या या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, हजारो नाविकांनी निलंबनाच्या विरोधात आपला निषेध व्यक्त करणाऱ्या लेखी याचिका सादर केल्या आहेत.

इतरही नाविक कामगारांनी अद्याप याचिका सादर केल्या नसतील, तर त्यांना लेखी याचिका सादर करण्याचा आम्ही सल्ला दिला आहे.

या बेकायदेशीर निलंबनाच्या विरोधात नुसीने हे प्रकरण इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन (ITWF) व आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेकडे (IMO) घेतले आहे. या विषयावर नुसीचे उपाध्यक्ष श्री. लुईस गोम्स व सहायक सरचिटणीस श्री. सुनिल नायर मुंबईमध्ये लकरच शिपिंग महासंचालकांशी भेट घेणार असून अँग्लो ईस्टर्न शिपिंग कंपनीचे बेकायदेशीर परवाना निलंबन ताबडतोब घेण्याची मागणी करणार आहेत.

नाविकांचा निर्णायक काळात आम्हाला सतत पाठिंबा मिळतो. या एकजुटीची आम्ही नेहमीच प्रशंसा करतो. असे नुसीचे जनरल सेक्रेटरी व खजिनदार श्री. मिलिंद कांदळगावकर यांनी सांगितले.

## भूमी अभिलेख उपअधीक्षक पद भरा

**वसई :** वसईच्या भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक रणजीत देशमुख यांची बदली झाल्याने महिनाभरापासून त्यांचे पद रिक्त आहे. तातडीने हे पद भरावे, अशी मागणी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे.

वसईच्या भूमी अभिलेख कार्यालयात गटबुक नकाशा, जागेचे सर्वेक्षण व इतर कामांसाठी नागरिक येतात. मात्र अधिकारी नसल्याने त्यांना कामात अडचणी येत आहेत. भूमी अभिलेख उपअधीक्षक पदावर नवीन सक्षम अधिकाऱ्यांची त्वरित नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी वसई काँग्रेसचे कुलदीप वर्तक यांनी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे एका पत्रद्वारे केली आहे.

## दिव्यांग प्राथमिक शिक्षकांची मुख्याध्यापकपदी पदोन्नती करावी

### दिव्यांग कर्मचारी संघटनेची मागणी

**बीड :** दिव्यांग प्राथमिक शिक्षकांची मुख्याध्यापकपदी पदोन्नती करून अनुशेष पूर्ण करावा, अशी मागणी दिव्यांग कर्मचारी संघटनेने केली आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद मधील प्राथमिक शिक्षकांमधून ३० मे रोजी ४८२ शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठता यादीमधील ज्येष्ठता क्रमांक १५७ पर्यंत ९० शिक्षकांना मुख्याध्यापकपदी नियुक्ती देण्यात आली आणि पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवल्याचे या निवेदनात म्हटले आहे. १ जून रोजी परत पदोन्नती प्रक्रिया चालू ठेवली. १५७ मधील १७ गैरहजर राहिलेल्या शिक्षकांना संधी देऊन पदोन्नती प्रक्रियेत समाविष्ट केले. परंतु, यावेळीही दिव्यांग शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता सुचीतील मुख्याध्यापक (प्रा.) पदोन्नतीसाठी बोलविण्यात आले नाही.

१२० शिक्षक व प्राथमिक पदवीधरांमधून समुपदेशनाने मुख्याध्यापकपदी निवड केली. २० एप्रिल २०२३ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे दिव्यांग प्रवर्गासाठी चार टक्के आरक्षणाप्रमाणे पाच दिव्यांग प्राथमिक शिक्षकांना दिव्यांग सेवा ज्येष्ठता सूचीप्रमाणे तत्काळ बोलावून दिव्यांग पदोन्नतीतील अनुशेष पूर्ण करावा, अशी मागणी दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष महादेव सरवदे यांच्यासह जिल्हा अध्यक्ष राजेंद्र लाड, आदिनाथ हाडुळे, सचिव इंद्रजित डांगे, नंदकुमार मोरे, कुरे, संजीवनी गायकवाड, आदी पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

## समानीकरणअभावी २३२ शिक्षक पदे रिक्त

**भोर :** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करताना समानीकरण न राबविल्यामुळे भोर तालुक्यात २३२ शाळांवर शिक्षक पदे रिक्त आहेत. तर ४३ शाळांवर शिक्षकच नव्हते. शिक्षण विभागाला हे समजताच त्यांनी तत्काळ ३२ शाळांवर तात्पुरती व्यवस्था केली आहे. पण उर्वरित शाळांचा प्रश्न लटकला आहे.

यामुळे भोर तालुक्यावर मोठा अन्याय झाला असून याचा परिणाम प्राथमिक शाळेतील मुलांच्या गुणवत्तेवर होणार आहे. एप्रिल २०२१च्या जीआरनुसार प्राथमिकच्या शिक्षकांच्या ऑनलाइन बदल्या केल्या. मात्र भोर तालुक्यात बदल्यांमध्ये तफावत राहिली असून शाळांवर प्राथमिक शिक्षक कमी आले आहेत.

## गुरुजी, तुम्ही धैर्याने परीक्षा द्या, कारवाई होणार नाही

### सीईओचे आवाहन

**बीड :** कोणत्याही शिक्षकावर कमी गुण मिळाले म्हणून प्रशासकीय कारवाई करणार नाही याची हमी स्वत: विभागीय आयुक्तांनीच संघटनांच्या बैठकीत दिली आहे. परीक्षेमध्ये कितीही गुण मिळोत पण ती देण्याचं धैर्य दाखवणे महत्वाचे असून जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी या परीक्षेला सामोरे जावे, शंभर टक्के उपस्थितीचे दर्शन घडवावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी केले आहे. शिक्षकांची गुणवत्ता वाढीसाठी व संवर्धनासाठी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शिक्षकांची परीक्षा घेण्यात येणार आहे. काही जिल्ह्यातून याला विरोध होत असलातरी बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी या परीक्षेला सकारात्मकतेने घेतले आहे. ही परीक्षा जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी देण्याबाबत सीईओंनी एका पत्राद्वारे आवाहन केले आहे.

केवळ स्वत:ला आपल्या सशक्त बाजू आणि उणिवा कळाव्यात हा परीक्षेचा हेतू असून उणिवा कळल्या तर त्या भागावर वाचन, चिंतन, चर्चा, लिखाणाच्या माध्यमातून मात करता येते. परीक्षेपासून पळ काढणारा भित्रा मनोवृत्तीचा असतो मग असे कमकुवत मनोवृत्तीचे शिक्षक विद्यार्थ्यांचे कोणते भविष्य घडवणार? परीक्षा जरी ऐच्छिक असली तरी सर्व शिक्षकांनी द्यावी आणि बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक वातावरणाचा परिचय या निमित्ताने विभागाला करून द्यावा, असे आवाहन पवार यांनी केले.

## शासन लोकांच्या दारात नेण्याची तयारी

**बीड :** 'शासन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील हजारोपेक्षा जास्त लाभार्थींना विविध शासकीय योजनांचे लाभ प्रमाणपत्र, शासकीय दाखले दिले जाणार आहेत. जिल्हास्तरावर होणाऱ्या कार्यक्रमात यातील तीन हजार लाभार्थींना पालकमंत्री अतुल सावे व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रातिनिधिक स्वरूपात थेट वितरण केले जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहामध्ये 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाबाबत बैठक संपन्न झाली. यावेळी या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी आक्रमकपणे प्रयत्न करण्याचा मनोदयदेखील उपस्थितांनी व्यक्त केला.

## प्रशासक राजमुळे विकासकामांना खीळ; निवडणुका त्वरित घ्या

### शहरवासीयांची मागणी

**गोरेगाव :** स्थानिक नगरपंचायत येथे मागील तीन वर्षांपासून प्रशासकराज सुरू असल्याने नगराचा विकास रखडला आहे. अधिकारी, कर्मचारी आपल्या मनमर्जीने काम करत असून नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

नगरपंचायतीत लोकप्रतिनिधी विकासकामांचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळे नगरवासी त्रस्त झाले असून वरिष्ठांनी दखल घेण्याची मागणी केली जात आहे. गोरेगाव नगरपंचायतीचा पंचवार्षिक कार्यकाळ संपुष्टात येऊन तीन वर्षांचा काळ लोटला आहे परंतु अद्यापही निवडणुका जाहीर झाल्या नाहीत. निवडणूक केव्हा होणार? याचा अंदाज बांधणे कठीण होऊ बसले आहे. त्यामुळे तीन वर्षापासून नगरपंचायतीवर प्रशासकराज सुरू आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने अधिकारी आपल्याच मनमर्जीने कामे करत आहेत.

नागरिकांच्या लहान सहान कामाकरिता कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहे. मुख्याधिकारी हे प्रभारी नियुक्त असल्याने आठवड्यातून एकदाच नगरपंचायत कार्यालयात कामाचा दिवस ठरविण्यात आली आहे. त्यामुळे इतर नगरपंचायतीमध्ये महत्त्वाचे काम असल्याच्या विकासात्मक कामांच्या प्रस्तावावर स्वाक्षरी घेण्यासाठी तिरोडा नगरपंचायत कार्यालयात जावे लागत आहे. नगरपंचायत कार्यालयात मुख्याधिकारी प्रभारी नियुक्त असल्याने अधिकांश कर्मचारी कार्यालयात वेळेत येत नसल्याची चर्चा आहे.

## शासन आपल्या दारी गतिमानतेने राबवा

**भिवंडी** : शासन निर्देशानुसार ‘शासन आपल्या दारी’ हा उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरु असून एकाच ठिकाणी एका छताखाली नागरिकांना वेगवेगळे लाभ मिळावेत अशारितीने ही योजना करण्यात आली असून, या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी आता संबंधित सर्व विभाग प्रमुखांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन हे उपक्रम, योजना नागरीकांमध्ये गतिमानतेने राबवावेत असे भिवंडी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी नुकत्याच एका आढावा बैठकीमध्ये मार्गदर्शन करतांना सांगितले आहे. सदरची आढावा बैठक मुख्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील आयुक्तांच्या सभागृहामध्ये पार पडली. यावेळी ते बोलत होते.

## चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाची सभा; दिलीप कडाळी यांचा सेवानिवृत्त सत्कार



**मुंबई** : राज्य सरकारी गट-ड चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघ महाराष्ट्र मंत्रालय मुंबई, या महासंघाची प्रबोधनी,राणे नगर नाशिक येथे कार्यकारिणीची सभा राज्य अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सत्रात संपन्न झाली.


दुसऱ्या सत्रात महाराष्ट्र कृषी चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेची सभा झाली या सभेत संघटनेचे सचिव दिलीप कडाळी हे आयुर्मानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांना शाल व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महासंघाचे सुरेश आहेरकर, भिकू साळुंखे, सुरेखा चव्हाण, बाबाराम कदम, प्रकाश घाडगे, मार्तंड राक्षे, रामदास शिराळे, रामभाऊ पांचाळ, एकनाथ लांडगे, ज्ञानेश्वर लोधे, ज्ञानेश्वर कासार, संध्या भोईटे, वंदना चव्हाण, जनाबाई साळवे, राजन राऊत, निजामोद्दीन शेख, अजय डूलगज, बाबाखान, मनोहर दिवेकर, मालोदे माऊली इत्यादी कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## गिरणी कामगारांच्या घरांसाठी प्रयत्नशील

**मुंबई** : गिरणी कामगारांचे मुंबईच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. अधिकाधिक गिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासाठी जागेचा शोध घेतला जात असून त्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गिरणी कामगारांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

म्हाडाने २०२० मध्ये गिरणी कामगारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलमधील सदनिकेच्या विक्री किमतीचा व मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या यशस्वी गिरणी कामगार/वारस यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चावी वाटप झाले, त्यावेळी ते बोलत होते.

# वांद्रे शासकीय वसाहतीत नव्या घरांची सुरुवात



**मुंबई** : वांद्रे शासकीय पुनर्विकास प्रकल्पांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील १२० घरांच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असून अ आणि ब वर्गातील अधिकाऱ्यांसाठी २ बीएचकेची घरे बांधली जाणार आहेत. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून येत्या १५ दिवसात निविदा मागविल्या जाणार आहेत. दुसरीकडे क आणि ड वर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठीच्या २००० घरांचे काम संथगतीने सुरू आहे. आता घरांच्या पूर्णत्वासाठी ऑगस्टचा मुहूर्त दिला जात आहे.

वांद्रे पूर्व येथे ९२ एकरवर शासकीय वसाहत वसलेली आहे. सर्व अ, ब, क आणि ड वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी तेथे निवासस्थाने आहेत. या वसाहतीतील सर्व इमारती जुन्या झाल्या असून मोडकळीस आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय वसाहतीचा पुनर्विकास हाती घेतला आहे. या पुनर्विकासांतर्गत शासकीय वसाहतीतील मोकळ्या जागेत ५१२० घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात २१२० घरांचे काम हाती घेण्यात आले आहे. क आणि ड श्रेणीसाठी ३८४ चौ. फुटांची घरे बांधली जात आहेत. या घरांचे काम हे २०१९ पासून सुरू असून हे काम मार्च २०२१ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र करोना आणि कामाच्या संथ गतीमुळे अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही.

मार्च २०२१ चा मुहूर्त चुकल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑगस्ट-सप्टेंबर २०२२ ची तारीख दिली. या कालावधीत काम पूर्ण न झाल्याने पुन्हा मार्च, एप्रिल २०२३ चा मुहूर्त दिला मात्र तोही बांधकाम विभागाने चुकवला. आता या घरांच्या पूर्णत्वासाठी ऑगस्ट २०२३ ची नवीन तारीख सांगितली जात आहे. ऑगस्टपर्यंत घरे पूर्ण करून ती सामान्य प्रशासन विभागाला हस्तांतरित करण्यात येतील. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडून घरांचे वितरण केले जाईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांने दिली.

शासकीय वसाहतीतील २००० घरांचे काम सुरू असतानाच आणखी १२० घरांच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. अ आणि ब वर्गातील अधिकाऱ्यांसाठी ही घरे असणार आहेत. घरे ८००-१००० चौ. फूटांची आहेत. त्या कामाच्या निविदा मागविण्यात येणार आहेत. दरम्यान ५१२० पैकी २१२० घरांचे काम मार्गी लागले असून उर्वरित ३००० घरांचे काम कधी सुरू होणार असा प्रश्न आहे. या विषयी वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारले असता ३००० घरांचे काम तसेच संपूर्ण वसाहतीचा पुनर्विकास विदेशी कंपनीकडून होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवी मुंबई पालिकेकडून कर्मचाऱ्यांवर कारवाई

**वाशी** : नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील (कायम) ९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशीअंती कारवाई करण्यात आल्याची माहिती प्रशासन विभागाचे उपायुक्त नितिन नार्वेकर यांनी दिली.

या चौकशी प्रक्रियेत संबंधितांना प्रथम कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यावर त्यांनी दिलेल्या खुलाशाने प्रशासनाचे समाधान झाले नाही. त्यामुळे त्यांनी केलेल्या चुकांच्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली. या चौकशी प्रकरणात दोषी आढळून आल्याने अखेर या कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर पुढील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

यामध्ये एक आरोग्य परिचारिका दीर्घकाळ विनाअनुमती रजेवर राहिली होती. त्यामुळे त्यांना पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होईल अशा प्रकारे महापालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. एक अधिक्षक दीर्घकाळ विना अनुमतीने गैरहजर राहिले होते. भावी काळात वेतनवाढीवर कायमचा परिणाम होणार नाही, अशारीतीने त्यांची एक वर्षासाठी पुढील वेतनवाढ रोखण्यात आली आहे. जन्म प्रमाणपत्र वेळेत देण्यात विलंब केल्या प्रकरणी एक अधिक्षिका आणि अन्य प्रकरणात इ. आर.पी. मध्ये बँक खाते क्रमांकात पालट करणारा वरिष्ठ लिपिक यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे.

एका शाखा अभियंत्याने भोगवटा प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचा खोटा अहवाल सादर केला होता. या प्रकरणी त्याच्या वेतनवाढीवर कायमचा परिणाम होईल, अशा रीतीने एक वर्षासाठी पुढील वेतनवाढ रोखण्यात आली आहे. तसेच एक अग्रिशमक आणि एक कक्ष सेविका हे दीर्घकाळ विनाअनुमतीने रजेवर राहिले होते. एक विशेष शिक्षक यांनी कामात हलगर्जीपणा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांशी उध्दट वर्तन केले होते. एका नेत्रशल्यचिकित्सकांनी त्यांच्या कामात हलगर्जीपणा केला होता. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधितांच्या वेतनवाढीवर कायमचा परिणाम होईल, अशारितीने एक वर्षासाठी पुढील वेतनवाढ रोखण्याची शिक्षा करण्यात आली आहे.

## कुंडलवाडी परिषदेला १ कोटी रुपयांचे बक्षीस

**नांदेड** : पृथ्वी, वायु, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर आधारित माझी वसुंधरा अभियानात उच्चतम कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांची गुणाक्रमानुसार निवड महाराष्ट्र शासनाने जाहीर केली आहे. या अभियानात कुंडलवाडी नगरपरिषदेला १५ हजारपेक्षा लोकसंख्येच्या गटातील विभागीय स्तरावरचे १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

या पारितोषिकासोबत नांदेड जिल्हाधिकारी यांना विभागीय स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याचा बहुमान मिळाला आहे. माझी वसुंधरा अभियान ३.० राबविण्यात आले. या निवडीबद्दल जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# खासगी सहभागातून एसटीला गती द्या : मुख्यमंत्री

**मुंबई** : एसटी महामंडळाने आता स्वावलंबी झाले पाहिजे. एसटी महामंडळ कुठे काही कमी पडत असेल तर मी एसटीच्या पाठीशी उभा आहे. मात्र एसटी महामंडळाने स्वत:च्या पायावर उभे राहणे गरजेचे आहे. कुठे निधीची कमतरता भासली तर मागून घ्या. मी अर्थमंत्र्यांशी बोलून निधीची तजवीज करेन. एसटीने सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडल राबवून विकासाच्या दिशेने पावले टाकली पाहिजेत. एसटीच्या जमिनीचे मूल्यवर्धन करून त्यावर महामंडळाने उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावेत, असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटीच्या अमृतमहोत्सवी वर्धापन दिन सोहळ्यात केले.

एसटीचा अमृतमहोत्सवी वर्धापनदिन नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात पार पडला त्यावेळी आमदार भरत गावले. एसटीचे सदिच्छादूत तथा अभिनेते मकरंद अनासपुरे, परिवहन बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया एसटीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्ष आणि एसटीचे अमृतमहोत्सवी वर्ष हा दुग्धशर्करायोग आहे. एसटी महामंडळाने ‘बहुजन हिताय बहुजन सुखाय’ या ब्रीदवाक्याप्रमाणे काम केले आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आणि महिलांना ५० टक्के प्रवास सवलत अशा योजनांमुळे एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ झाली आहे.

सध्या १६ हजार बस एसटीच्या ताफ्यात आहेत. लवकरच ७ हजार बस येतील. यासह बस स्थानकांवर जमीन उपलब्धतेनुसार मराठी चित्रपटांसाठी ‘मिनी थिएटर’ ही नवीन संकल्पना राबवण्यात येईल. ‘**धर्मवीर आनंद दिघे मोफत आरोग्य तपासणी योजना**’ एसटी कर्मचारी विशेषत चालक, वाहक यांची दैनंदिन कामाची धावपळ असते. त्यांना जवळपास १० प्रकारच्या आरोग्य तपासण्या एसटी महामंडळाच्या माध्यमातून मोफत करून देण्यात येणार आहेत. या योजनेसाठी ‘**धर्मवीर आनंद दिघे मोफत आरोग्य तपासणी योजना**’ असे नावही कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले.

## शिपाई नसल्यामुळे शाळांच्या अडचणी

**मुंबई** : मुंबईत विविध पदे रिक्त असून त्यात शिपायांची १,७९७ पदे तसेच ३११ हमाल आणि १२२ माळी आणि रखवालदारांची पदे रिक्त आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना सदर माहिती अधिकाराअंतर्गत शिक्षणाधिकारी कार्यालयाने ही माहिती दिली आहे.

शिपायांची एकूण मंजूर पदे २,६३५ असून रिक्त पदांची संख्या १७९७ आहे. हमाल पदे ६०२ असून ३९१ पदे रिक्त आहेत. तर माळी आणि रखवालदारांची १२२ पदे रिक्त असून मंजूर पदांची संख्या २३१ आहे. ही पदे भरली गेली नाही, यामुळे शाळांना कामकाजात अडचणी येत असून पदे तत्काळ भरणे आवश्यक आहे.

# ‘कर्मचारी टाईम्स’ दिवाळी २०२३ अंकासाठी आवाहन

**मुंबई** : ‘कर्मचारी टाईम्स’ वृत्तपत्राच्या स्वरुपात आपल्या भेटीला येत असते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या हितासाठी जे निर्णय राज्यशासन घेत असते ते पोहचवतानाच कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासकीय स्तरावर पोहचवण्याचे महत्वाचे कामही या वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

दिवाळी निमित्त ‘कर्मचारी टाईम्स’ दिवाळी २०२३ अंक प्रसिद्ध करावा अशी अनेक वाचकांची सूचना व्यवस्थापक मंडळाला आवडली म्हणूनच यंदाच्या दिवाळीत आपल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सर्वोत्तम साहित्याची भेट आपण आपल्या वाचकांना देणार आहोत. त्यासाठी अधिकारी / कर्मचारी मान्यवर, प्रथितयश तसेच नवोदित साहित्यिकांनी आपले अप्रकाशित साहित्य, विशेषत: शासकीय कार्य, कर्मचाऱ्यांच्या समस्या, व्यथा आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाला प्रकाशझोतात आणण्यासाठी केलेल्या संवर्धनात्मक लेख, कथा, कविता, मुलाखत ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत karmacharitimes@gmail.com ह्या ईमेलवर किंवा ‘कर्मचारी टाईम्स’, संपादक, ६ व ९, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२ या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन आहे. अंतिम तारखेनंतर आलेल्या साहित्याचा दिवाळी अंकासाठी विचार करण्यात येणार नाही. अधिकारी / कर्मचारी साहित्यिकाने आपल्या आवडीची सर्वोत्तम कथा, कविता वा लेख यापैकी एकच साहित्यकृती दिलेल्या मुदतीत पाठवावी. जास्तीतजास्त साहित्यिकांचा अंकात समावेश व्हावा म्हणून एका साहित्यिकाच्या एकाच कलाकृतीचा अंकात समावेश केला जाईल. साहित्यासोबत सदर साहित्य स्वतचे असल्याचे नाव, पता, स्वाक्षरी असल्याचे हमीपत्र पाठविण्यात यावे. लिखीत हमीपत्राशिवाय साहित्य स्वीकारले जाणार नाही.

आपण कोणत्या विभागात कार्यरत आहात त्याचा उल्लेख आणि पद लिहिणे अनिवार्य आहे. साहित्य निवडीचा अधिकार निवड समिती राखून ठेवत आहे. अधिक माहितीसाठी गुरुदत्त वाकदेकर, उपसंपादक ९९८७७४६७७६ यांच्याशी संपर्क साधावा.

## ऊस तोड कामगारांची ई श्रम पोर्टलवर नोंदणी

**मुंबई** : राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्य सरकार सकारात्मक असून राज्यातील ऊस तोड कामगार आणि शेतमजुरांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याची मोहिम हाती घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ऊस दर नियंत्रण समिती व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री अब्दुल सत्तार आदी उपस्थित होते.

# रुग्णालयांत चतुर्थश्रेणी पदे त्वरित भरण्याचे आदेश

**मुंबई** : रुग्णालयातील सर्व चतुर्थश्रेणी पदे तातडीने भरण्याचा आदेश देण्यात आले आहे.

करोनाकाळात रुग्णालयांतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येचा फटका रुग्णसेवेला बसला होता. त्यामुळे ही पदे तातडीने भरण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्याअनुषंगाने राज्यातील सर्वच रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, स्वास्थ्य केंद्र, परिचर्या शिक्षण संस्था आणि आयुर्वेदिक महाविद्यालयांमध्ये तातडीने चतुर्थश्रेणी वर्गातील रिक्त जागा ऑनलाइन पद्धतीने भरण्याच्या सूचना वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आयुक्तांनी सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांना दिले. त्यानुसार तीन ते चार महिन्यांमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्याची सूचनाही केली आहे. राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतील चतुर्थश्रेणी संवर्गातील रिक्त पदे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली भरण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाकडून ४ मे २०२२ रोजी सर्व अधिष्ठात्यांना दिले होते.

चतुर्थश्रेणी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे १०० टक्के भरण्याबाबत मंत्रिमंडळाने मान्यता देऊनही अधिष्ठात्यांकडून पदभरतीकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आयुक्त राजीव निवतकर यांनी सेंट जॉर्जेस रुग्णालयाच्या आवारातील आयुष संचालनालयामध्ये बैठक घेतली. त्यावेळी सर्व अधिष्ठाता व रुग्णालय प्रमुखांना चतुर्थश्रेणी संवर्गाची सरळसेवा पद्धतीने भरती करण्याच्या सूचना दिल्या.

मुंबईतील रुग्णालयांत ६०० पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. सेंट जॉर्जेस-कामा रुग्णालय येथे सुमारे ६००-७०० पदे रिक्त असण्याची शक्यता आहे.

# जर्मनीची मनुष्यबळाची मागणी पूर्ण करणार : केसरकर



**मुंबई** : युरोपीय देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. महाराष्ट्रातील युवकांना कौशल्य शिक्षण देऊन परदेशामध्ये नोकरी मिळवून देण्यासाठी राज्य शासन सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहे. जर्मनीनेसुद्धा याबाबत उत्सुकता दर्शविली असून त्यांची कुशल मनुष्यबळाची गरज महाराष्ट्र पूर्ण करू शकेल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

युरोपियन देशांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरवण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत राज्यस्तरीय कृती गट स्थापन करण्यात आला आहे. गटाची बैठक अध्यक्ष शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषी मंत्री अब्दुल सत्तार, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वैद्यकीय शिक्षण सचिव अश्विनी जोशी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक दिगंबर दळवी, शालेय शिक्षण आयुक्त तथा कृती गटाचे सदस्य सचिव सूरज मांढरे आदी यावेळी उपस्थित होते.

दीपक केसरकर म्हणाले, युरोपियन देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. भारतामध्ये विशेषत: महाराष्ट्रामध्ये असलेली युवकांची मोठी संख्या आणि कुशल मनुष्यबळाची उपलब्धता पाहता त्यांना युरोपियन देशांमध्ये रोजगाराची मोठी संधी आहे. जर्मनीच्या शिष्टमंडळाने नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र भेटीत कुशल मनुष्यबळाची आवश्यकता व्यक्त केली होती. त्यानंतर आपल्या जर्मन भेटीत त्यांनी सामंजस्य करार करण्यास उत्सुकता दर्शविली असून त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्रातील युवकांना जर्मनीच्या तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. या माध्यमातून जर्मनीची गरज पूर्ण होऊन राज्यातील युवकांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.पाटील यांनी जर्मनीची गरज आणि मागणी लक्षात घेऊन त्यानुसार प्रशिक्षण देण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण, कौशल्य विकास विभागाने पुढाकार घ्यावा तसेच विद्यार्थ्यांना ज्या देशांमध्ये संधी आहे, त्या देशांची भाषा शिकविण्यात यावी, असेही मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्यातील कौशल्य विकास, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, कृषी, उद्योग अशा विविध विभागांतर्गत कौशल्य प्रशिक्षण देणे शक्य असल्याचे सांगून युरोपियन देशांच्या मागणीनुसार आपल्या विभागांतर्गत करता येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

## महत्वाचे शासन निर्णय (जीआर)

www.maharashtra.gov.in

| विभाग | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| वित्त विभाग | ३१-०३-२०२३ | परिमापित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत. |
| मृद व जलसंधारण विभाग | २६-०५-२०२३ | गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविणेबाबत अंतर्गत अतिरिक्त सुचना. |
| पर्यटन व सांस्कृतिक कार्यविभाग | २६-०५-२०२३ | स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा दिनांक २८ मे हा जन्मदिवस स्वातंत्र्यवीर गौरव दिन म्हणून साजरा करणेबाबत. |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ०५-०६-२०२३ | असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP) वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTA) स्पर्धेचे आयोजन करणेबाबत. |
| वित्त विभाग | ०६-०६-२०२३ | निविदा/करारनामा प्ररूपामध्ये, लवादाच्या आदेशानुसार कार्य सेवा कंत्राटाच्या अनुषंगाने विलंबाने होणारे प्रदान /न्यायालयीन प्रकरणानुसार करावयाचे प्रदान अशा प्रकरणी व्याजदराची तरतूद निविदा / करारनाम्यामध्ये समाविष्ट करणेबाबत. |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ०७-०६-२०२३ | शासन सेवेत सरळसेवेने नियुक्तीसाठी राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंच्या कमाल वयोमर्यादेत दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत शिथिलता देणेबाबत. |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ०८-०६-२०२३ | समग्र शिक्षा कार्यक्रमातर्गत मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीबाबत. |

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



श्री. अशोक शिंदे
कार्यकारी संपादक
कर्मचारी टाईम्स
०४-०७-२०२३

उंच गगन भरारी घेऊन
राहो तळपत स्वाभिमान
स्फूर्ती लाभावी शब्दांना
अन् लेखणीस अभिमान

-: शुभेच्छुक :-
‘कर्मचारी टाईम्स’
परिवार

## संपादकीय

### बदल्यांबाबत चुकीचा संदेश नको...

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा विषय सध्या गाजताना दिसत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून बदल्यांचा प्रश्न रेंगाळलेला होता. पण शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी त्वरित याबाबत हालचाल सुरु केली आणि हा प्रश्न मार्गी लावला. त्यामुळे वेगवेगळ्या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर या बदल्या झालेल्या दिसून येत आहेत. यात विशेष म्हणजे सार्वजनिक आरोग्य खात्यातील २ हजार ४७१ कर्मचाऱ्यांच्या बदल्या ऑनलाइन पद्धतीने करण्यात आल्या. त्यासाठी संगणकीय प्रणालीचा पहिल्यांदाच वापर झाल्यामुळे या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता होती. असे असले तरी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी यामागे भ्रष्टाचार असल्याचा आरोपदेखील केला आहे. कृषी साहाय्यक पदासाठी तीन लाख रुपयांचा दर सुरू आहे. वन विभागातही बदल्यांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. काही ठराविक आमदारांना बदल्यांचे अधिकार देण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांनीसुद्धा दरपत्रक मुख्यमंत्री व राज्यपाल यांना पाठवले होते. त्याशिवाय काही आमदार हेदेखील सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबत आग्रही होते, काही तर दलाल म्हणूनदेखील कार्यरत होते, अशा स्वरुपाच्या चर्चादेखील यातून ऐकायला येत होत्या. मात्र अशा स्वरुपाचे निर्णय होत असताना चर्चा वेगवेगळ्या स्वरुपात होत असतात. मात्र सामान्यांमध्ये याबाबत वेगळाच संदेश जात असतो. बदल्यांचे हे सर्व वातावरण ध्यानात घेता बदल्या केवळ भ्रष्टाचारातूनच होत असतात, असा समजदेखील लोकांमध्ये पसरत असतो. त्यामुळे बदली झालेल्या शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टीकोनदेखील बदलण्याची शक्यता असते. यात एक बाब महत्वाची असते ती अशी की, नियमाप्रमाणे बदल्या होत असतात, त्यासाठी ठराविक निकष देखील असतात. आजच्या काळात आरटीआय आणि अन्य प्रणालींमुळे या सर्व अनिष्ट प्रथांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न होत असतो. तरीही जर या बदल्या चुकीच्या पद्धतीने होत असतील तर ते निंदनीय आहेच. वास्तविक अशा प्रकारच्या बदल्या करण्यासाठी सत्तेतील संबंधितांनी आपली भूमिका अधिक कठोर ठेवली पाहिजे. त्याला कुठल्याही प्रकारचा थारा देता कामा नये. या बदल्या जर प्रभावाने किंवा कुठल्याही हितसंबंधांतून होत असतील किंवा करण्याचा जर प्रयत्न होत असेल तर त्याला वेळीच पायबंद घातला तर भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत. त्याचबरोबर समाजातील जागरूक कार्यकर्त्यांचेही याकडे लक्ष राहिले पाहिजे. जेणेकरून शासकीय सेवांचे वातावरण दूषित होणार नाही. प्रभावाने बदली घेऊन आलेला अधिकारी हा कधीही सेवाभाव मनात ठेवून काम करेलच, याची खात्री नाही. त्यामुळे सर्व यंत्रणांवर त्याचा परिणाम होत असतो. अशा परिस्थितीत बदल्यांच्या मुद्यांवरून राजकारण नको तसेच इतर माध्यमांतूनही चुकीचा संदेश जाणार नाही, याची काळजी घेतली गेली पाहिजे.

# असंघटित कामगार - संघटितांचे कर्तव्य

**ह.कृ.परांजपे**

भारतातील सरकारी आणि भांडवलवाल्या गोटामधूनच नव्हे तर अनेक वर्तमानपत्रांतून आणि बुद्धिवंतांकडून संघटित कामगारांवर स्वार्थीपणाचा आणि देशहिताकडे दुर्लक्ष करण्याचा आरोप अनेकदा केला जातो. असे म्हंटले जाते की, देशातील एकूण उत्पादनाचा प्रमाणाबाहेर वाटा जे कामगार विशेष संघटित आहेत त्यांच्या पदरात पडतो. त्यांच्या संघटना मजबूत असल्याने सरकारला आणि मालकांना तोंड देऊन, त्याचप्रमाणे कायदेशीरपणे भांडून त्या आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात. त्याचा परिणम असा होती की, वेतन, महागाई भत्ता व इतर सर्व फायदे लक्षात घेता या कामगारांना खरेखुरे, मोठे वेतन मिळते.

या संदर्भात सरकारी क्षेत्रातील अनेक उद्योगधंद्यांतील कामगारांचा विशेष उल्लेख केला जातो. राष्ट्रीय मालकीच्या बँका, आयुर्विमा मंडळ, इत्यादींतील कामगारांवर अनेक मंडळी आरोप करतात की, लायकी आणि काम यांच्या मानाने या कामगारांना अव्वाच्यासव्वा वेतने मिळतात. त्याचप्रमाणे मुंबई-पुण्याच्या आसमंतातील इंजिनियरिंग, इलेक्ट्रॉनिक्स वगैरे कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांबाबतही असे म्हटले जाते की, त्यांना जी वेतने मिळतात, यशस्वी झगडे करून जी वेतने ते पदरात पाडून घेतात, ती या देशाच्या अर्थव्यवस्थेला पेलण्यासारखी नाहीत. अशी वेतने मिळवणाऱ्या वर्गाचा सरकारी तसेच काही अर्थशास्त्रीय गोटात ‘उच्च वेतनाची बेटे’ असा उल्लेख केला जातो. असे म्हटले जाते की, मक्तेदारी, ताकद असणारे कारखानदार अगर व्यापारी ज्या तऱ्हेने गिऱ्हाईकांचे आणि शेवटी अर्थव्यवस्थेचे शोषण करून आपले फायदे वाढवतात, तसेच हे कामगारही आपली भरमसाट वेतनेही सामान्य जनतेच्या, विशेषत: दरिद्री लोकांच्या पिळवणुकीवर मिळवतात.

हा विचार भारतातील सध्याची मूलत: भांडवलशाहीवर आधारलेली अर्थव्यवस्था लक्षात न घेता मांडला जातो. या व्यवस्थेत ज्यांच्याजवळ भांडवल अगर उत्पादनाची दुसरी साधने आहेत अगर ज्यांनी येनकेन प्रकारे राज्यसंस्थेत आपली खाजगी भागीदारी निर्माण केली आहे, त्या मंडळीच्या खऱ्याखुऱ्या उत्पन्नावर आणि उपभोगावर कोणतेही नियंत्रण उपयोगी पडू शकत नाही. कारखानदार, व्यापारी यांचा वर्ग घ्या, डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट्स, यांच्याकडे बघा, संपन्न शेतकरी आणि बागाईतदार यांची उत्पन्ने लक्षात आणा किंवा राज्यकर्त्यांचा जो एक नवीनच वर्ग देशात वाढत आहे त्यांचे खरे राहणीमान बघा. या मंडळींकडून अर्थव्यवस्थेस होणारा फायदा आणि ते अर्थव्यवस्थेकडून घेत असलेले उत्पन्न, यामध्ये काही मेळ दिसतो काय? सरकारने बसविलेले कर अगर नियंत्रणांचा या वर्गांचे वाढते आणि उधळपट्टीचे जीवनमान रोखण्यास थोडा तरी उपयोग होतो का? या प्रश्नांची उत्तरे आहेत.

अशा या अर्थव्यवस्थेत कामगार वर्गापैकी जे फार थोडे गट आपापल्या संघटना चांगल्या बांधून आहेत आणि सरकार व मालकवर्गाशी झगडा देण्याची ज्यांची ताकद आहे, अशांनी आपले जीवनमान टिकविण्यासाठी अगर वाढविण्यासाठी प्रयत्न केले, आणि त्यात काही यशस्वी झाले, तर त्याचा एवढा बाऊ का करण्यात यावा? असे कोणालाही म्हणता येणार नाही की, या कामगारांचे राहणीमान प्रचंड प्रमाणात सुधारले आहे. त्यातील अनेकांना इतके यश मिळाले आहे की, जे वेतनमान झगडा करून त्यांनी मान्य करुन घेतले त्यात सततच्या भाववाढीमुळे फार घट त्यांनी होऊ दिलेली नाही; महागाई भत्ता चांगल्या प्रमाणात मिळावा अशी मागणी मान्य करुन घेण्यात त्यांच्यातील काहींनी यश मिळवले आहे. फारच छोटा वर्ग असा आहे की, ज्यांनी आपली वेतने सातत्याने वाढवून मिळविली आहेत. अशी स्थिती अशा थोड्या धंद्यामधील कामगारांची आहे की, ज्यामध्ये मक्तेदारीची स्थिति आहे. या धंद्याची मालकमंडळी मालाचे भाव आपणास योग्य वाटतील तसे वाढवून घेऊ शकतात व मोठे फायदे मिळवू शकतात. अशा कामगारांनी या मक्तेदारी फायद्यात वाटा मिळवू पाहिला व त्यांना तो मिळाला तर त्यात वाईट वाटण्यासारखे काय आहे? जोवर मक्तेदारी नियंत्रणात येत नाही, तोवर निदान कामगारांना त्यातला काही वाटा मिळाला तर अन्याय काहीसा कमी होतो असे म्हटले पाहिजे.

परंतु याबरोबरच संघटित कामगारांनी हे विसरून चालणार नाही की, त्यांच्या मागण्या पूर्ण करुन घेण्यात त्यांना जे यश मिळते त्यामागे गेल्या ५० वर्षांत वाढलेल्या कामगार चळवळीची, अनेक तऱ्हेच्या झगड्यांची व मजूर-कामगारांना पाठिंबा देणाऱ्या लोकमताची मोठी पूर्वपीठिका आहे. हे सर्व नसते तर त्यांच्या संघटना झोडपून काढणे, त्यांना वाटाण्याच्या अक्षता देणे हे मालकांना व सरकारला अवघड झाले नसते. हे आपल्या लक्षात असून हे आपण विसरलेलो नाही, असे दाखवण्याचा संघटित कामगारांपुढे एकच स्पष्ट मार्ग आहे. तो म्हणजे जे कामगारबंधू अजून कमी संघटित अगर असंघटित आहेत त्यांना संघटित होण्यास आणि त्यांच्या संघटना जेव्हा झगडे करतील तेव्हा त्यामध्ये, त्यांना व्यवस्थित मदत करणे. संघटनेच्या प्रभावाने संघटित कामगाराला जे जास्त वेतन मिळते, त्याचा काही प्रमाणित भाग-पाच अगर दहा टक्के अशा कामासाठी बाजूला ठेवून असंघटित वा कमी संघटितांना संघटित होण्यास अगर लढे लढवण्यास त्यातून मदत करणे हे त्यांनी स्वत:चे कर्तव्य समजले पाहिजे.

या दृष्टीने एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आयुर्विमा मंडळ, बँका आणि अशा काही संस्थामधील कामगार संघटनांनी या तऱ्हेची जबाबदारी स्वीकारण्याचा वाढता प्रयत्न चालवला आहे. त्यांनी ‘असंघटित कामगार संघटन समिती’ या नावाची संघटना स्थापिली असून तिच्यामार्फत काही तालुक्यांतील असंघटित कामगारांची संघटना करु पाहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जेवणाचा खर्च अशा फंडातून भागवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ही केवळ सुरुवात आहे. एक दोनच कार्यकर्ते एक-दोनच विभागात या तऱ्हेने मदत मिळवू शकत आहेत. पण हा विचार जितका प्रसृत होईल तितके जास्त पूर्णवेळ कार्यकर्ते असंघटितांसाठी संघटनेत काम करू शकतील. जेवणाचा खर्च निघाला म्हणजे असे कार्यकर्ते पुरेसे मिळतील असे मुळीच नाही. असे कार्य करण्याची प्रथा लुप्त झाली नसली तरी कमी नक्कीच झाली आहे. पण निदान असे काम करण्याची ज्यांची तयारी आहे त्यांना रोजच्या पोटापाण्याची विवंचना करावी लागली नाही तर त्यांचे काम काहीसे सोपे होईल. या दृष्टीने हा प्रयत्न फार योग्य आहे असे म्हटले पाहिजे जितके संघटित कामगार व त्यांच्या संघटना हा विचार मान्य करतील तितका देशाचा मोठा फायदा होईल.

या अनुषंगाने आणखी एक विचार थोडक्यात पण आवर्जून मांडला पाहिजे. देशाच्या वेगवेगळ्या भांगातून येणाऱ्या बातम्यांवरून हे उघड होत आहे की, विशेषत: ग्रामीण भागांत असंघटित कामगार थोडा संघटित होऊ लागला, जागृत होऊन आपल्या मागण्या पुढे रेटू लागला की, मोठ्या प्रमाणावर झगड्याचे वातावरण निर्माण होते. पोलिस आणि बाकी राज्ययंत्रणा बहुअंशी असंघटितांच्या विरूध्द उभी राहते. त्यातून उद्‌भवणाऱ्या जुलमाची, छळाची वर्णने हळूहळू वर्तमानपत्रांतून पुढे येऊ लागली आहेत. पण या प्रसिद्धीचा किंवा राज्य विधिमंडळातील अगर संसंदेतील चर्चांचा विशेष फायदा होतो असे दिसत नाही.

हे असेच चालू राहिले तर या संघर्षाला हळूहळू हिंसेचे आणि यादवी युध्दाचे वळण लागू शकेल. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश यांमधील दरोडेखोर आणि डाकूच्या टोळ्या, त्यांचे आपसांतील त्याचप्रमाणे पोलिसांशी होणारे समरप्रसंग, यांची संख्या वाढती आहे. भष्ट्रचारी राज्ययंत्रणेकडून आपणास न्याय मिळण्याची शक्यता नाही अशी भावना झालेले अनेक लोक आपणांवरील अगर आपल्या कुटुंबावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी कायदा हातात घेऊन बदला घेतात आणि मग शिक्षा चुकवण्यासाठी दरोडेखोरांच्या टोळीत सामील होतात. असेही दिसून येते की, यातील अनेक व्यक्ती या सामान्य लोकांस त्रास देत नाहीत; उलट सरकारी अगर संपन्न व्यक्तीस केवळ त्याचा उपसर्ग होतो. जर असंघटित कामगार, हरिजन, गिरिजन यांवरील अत्याचार चालू राहिले, संघटना होऊनही त्यांच्या मागण्या मान्य करण्याऐवजी संपन्न वर्ग आणि सरकार यांच्या हातमिळवणीने त्यांना दडपण्याचा प्रयत्न चालू राहिला, तर त्याला हिंसात्मक विरोध करण्याशिवाय दुसरे उत्तर राहणार नाही.

# असंघटित कामगारांपुढील समस्या

**वसंत खानोलकर**

भारतात सुमारे पंचाहत्तर टक्के औद्योगिक कामगार असंघटित आहेत. शेतमजुरांचा समावेश केल्यास संघटितांचे प्रमाण आणखी बरेच घटल, शिवाय छोट्या छोट्या उद्योगधंद्यातील व ग्रामीण भागातील ज्या काही संघटना आहेत त्याही कमजोर आहेत. कामगार चळवळीपुढे ज्या काही महत्त्वाच्या समस्या आहेत त्यांमध्ये दुर्बल कामगारांच्या संघटनांना सहाय्य करणे व असंघटितांना संघटित करणे या समस्येचाही समावेश होतो.

महाराष्ट्राचेच उदाहरण घेऊ. शहरी किंवा विकसनशील भागात, एकाच कारखान्यात वा संस्थेत जरी नसले, तरी एकाच प्रकारच्या व्यवसायात व एका परिसरात काम करणारे, पण दुर्बल घटकात मोडणारे कामगार काही प्रमाणात संघटित आहेत. मुंबई शहरातील हॉटेल कामगार, गुमास्ते, डोक्यावरून ओझी वाहणारे माथाडी कामगार, ठेकेदारी पद्धतीखाली काम करणारे कामगार, किरकोळ मुदतीसाठी नेमले जाणारे (कॅज्युअल) कामगार, महाराष्ट्रातील काही थोड्या केंद्रांतील हमाल, राज्यातील निरनिराळ्या केंद्रात काम करणारे विडी कामगार, भिवंडी-इचलकरंजीसारख्या ठिकाणी काम करणारे यंत्रमाग कामगार वगैरे कामगारांचा यात समावेश होतो. शहरी व निमशहरी विभागात छोट्या प्रमाणावर चालणाऱ्या कारखान्यांतील कामगारांचाही यात समावेश होतो. अशा या संघटनांतही ज्यांना आपल्या संघटित कृतीने आपला काही प्रभाव पाडता येतो त्यांना अल्प प्रमाणात का होईना, यश पदरात पाडता येते. याची उदाहरणे म्हणजे मुंबईतील गुमास्ते, हॉटेल कामगार, माथाडी कामगार, छोटया छोटया प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करणारे कामगार. पण इतरांना तेही जमत नाही, याचे उत्कृष्ट उदाहरण द्यावयाचे झाल्यास विडी कामगार, यंत्रमाग कामगार वगैरेंचा उल्लेख करता येईल.

दुर्बल वा असंघटित असलेल्या कामगारांना लागू असणाऱ्या कायद्यांना काही तोटा नाही. औद्योगिक तंटे सोडविण्यासाठी यंत्रणा पुरवणारा औद्योगिक विवाद कायदा, दहापेक्षा जास्त कामगार काम करीत असलेल्यांना लागू असणारा ग्रॅच्युइटी कायदा, दुकाने व संस्थांसाठी असलेला व कामगारांना कामाच्या ठिकाणी किमान सोयी उपलब्ध असाव्यात म्हणून झालेला शॉप्स आणि एस्टॅब्लिशमेंटस् कायदा, वेतन वगैरे बुडविले गेल्यास वसुलीसाठी पेमेंट ऑफ वेजीस कायदा वगैरे प्रकारचे कायदे आहेत. महाराष्ट्रात सुमारे ४५ धंद्यांतील कामगारांना किमान वेतन कायदा लागू आहे. शेतमजुरांनाही किमान वेतन लागू केले आहे, त्यात सुधारणा व्हावी म्हणून नव्याने एक समितीही नेमली गेली आहे. किमान वेतनासारखा कायदा हा असंघटितांना कायद्याप्रमाणे ठरलेल्या न्यूनतम वेतनाची शाश्वती मिळावी, म्हणून केलेला कायदा आहे. संघटित कामगार चळवळीने दुर्बलातल्या दुर्बलाला किमान काही आधार असावा म्हणून केलेल्या प्रयत्नामुळे यापैकी बरेचसे कायदे झाले आहेत वा पूर्वीच अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा झाली आहे. या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने घोर निराशा आहे. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी असलेली शासकीय यंत्रणा फार अपुरी आहे जी काही आहे ती काही प्रमाणात लाचलुचपतीने ग्रासलेली आहे. काही प्रमाणात स्थानिक वरिष्ठ आणि बलिष्ठ व्यक्तींच्या दबावाखाली आहे. यंत्रणेतील ज्या अधिकाऱ्यांना निस्पृहपणे काम करण्याची उमेद आहे त्यांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. कायद्याप्रमाणे ठरलेले न्यूनतम वेतन हे अनेक धंद्यांच्या बाबतीत अतिशय असमाधानकारक असूनही त्याचीही अंमलबजावणी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. असंघटित कामगारांच्या बाबतीत मुंबईसारखे शहरही याला अपवाद नाही. मुंबईमध्ये असलेल्या अनेक औद्योगिक वसाहतींत छोट्या छोट्या कारखान्यांत हे सगळे कायदे पायतळी तुडवले जात आहेत. कायद्याप्रमाणे कारखान्यात कामगारांच्या प्रकृती स्वास्थ्याच्या दृष्टीने पाळावयाचे नियम, कामाच्या तासांच्या व जादा कामाच्या वेतनाच्या बाबतीत पाळावयाचे नियम, किमान वेतनाच्या बाबतीत पाळावयाचे निर्बंध वगैरे काही पाळले जात नाही आणि या बाबतीत जर कुणी हालचाल केली तर संबंधित कामगारांना डिच्चू दिला जातो आणि कायदा व यंत्रणा यासंबंधी बेफिकीर असलेल्या मालकांच्याबाबत शासन काही करू शकत नाही आणि जिथे शासन यंत्रणेकडून अल्प प्रयत्न होतो तिथेही इतका विलंब लागतो की, त्यामुळे संबंधित कामगार हवालदिल होतात आणि हतबल ठरतात. मुंबईसारख्या शहरात असंघटित कामगारांची ही स्थिती, तर इतरत्र काय असेल, याची आपण कल्पना करू शकतो. मुंबईत काम करणाऱ्या मिल मजदूर सभेच्या संशोधन व विकास विभागातर्फे त्या विभागाच्या संचालक डॉ. शांता वैद्य यांनी इचलकरंजी येथील यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगारांच्या परिस्थितीबाबत पाहाणी करून काढलेले निष्कर्ष गेल्या वर्षी पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले आहेत. तिथे कामगारांची परिस्थिती किती शोचनीय आहे व सर्रासपणे कायद्याचेही उल्लंघन कसे होत आहे, याची माहिती मिळते.

मुंबईसारख्या शहरातही छोट्या छोट्या कारखान्यातून काम करीत असलेल्या कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न केला आणि काही हालचाल केली तर ते प्रयत्न कसे हाणून पाडले जातात याची अनेक मासलेवाईक उदाहरणे देता येतील. संबंधित कामगार हे आपले कामगारच नाहीत, असे सांगितले जाते. तसे सिद्ध करण्यासाठी बनावट कागदपत्र सादर केले जातात. हजेरी व वेतन पत्रकेही नसतात. कायद्याप्रमाणे वेतन दिल्याचे खोटे पुरावेही सादर केले जातात. एकाच गाळ्यात चालू असलेले एकाच प्रकारचे उत्पादन, पण तीन-चार निरनिराळ्या फार्म्सच्या नावावर काम चालू ज्याचा कामगारांनाही पत्ता नसतो. रातोरात फर्म्सच्या नावाची पाटी बदलली जाते आणि या सर्वांना तोंड देऊनही जर काही निर्णय हाती लागलाच तर त्याची अंमलबजावणी केली जात नाही, हतबलता येते. शासकीय यंत्रणा जिथे दारात उभी आहे. वाहतुकीची चांगली सोय आहे, संघटित शक्तीचा काही आधार आहे, अशा ठिकाणी जर ही अवस्था असेल तर जेथे या सर्वांचा अभाव आहे त्या ठिकाणी काय परिस्थिती असेल ?

असंघटितांना संघटित करण्यात अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. ज्या मालकाकडे तो काम करतो त्याचा दबाव, कौटुंबिक स्थितीचा दबाव, ग्रामीण व नागरी भागात सरकारी अधिकारी व प्रतिष्ठित समजली जाणारी मंडळी यांचा दबाव अशा प्रकारच्या स्थितीमुळे तो दबलेला असतो. आपल्या मालकाकडून वेळीअवेळी घेतलेल्या कर्जाच्या ओझ्या खालीही तो असतो. त्यामुळे एक प्रकारची लाचारीही निर्माण झालेली असते. अनेक ठिकाणी तो आपल्या वरिष्ठांच्या नात्यागोत्यातीलही असतो. संघटित होण्याचा आपण प्रयत्न केला तर आपल्यावर अधिक संकटे कोसळतील, अशी साधार भीती त्याला मनातून वाटत असते. म्हणून संघटना उभारण्याचा प्रयत्न झाला तरी तो दबकत दबकतच वावरत असतो, निर्धाराने पुढं येवू शकत नाही. कायद्याने आधार दिलेला असला तरी शासन यंत्रणा आपणास न्याय देवू शकणार नाही, असे त्याला वाटत असते. अशा अनेक कारणांमुळे त्याला संघटित करण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना त्याच्याकडून पुरेसा प्रतिसादही मिळत नाही आणि अशा या परिस्थितीत त्याला संघटित करण्याचा प्रयत्न करणारेही थकतात.

मोठमोठाले कारखाने वा संस्था यांतील संघटित झालेले कामगार आपल्या संघटित शक्तीच्या जोरावर आपल्या परिस्थितीत सुधारणा करू शकले आहेत, आणखी करीत आहेत. पण हा असंघटित कामगार मागे पडत चालला आहे, आणखी पडत आहे त्याची दारिद्र्यावस्था दिवसेंदिवस शोचनीय बनत चालली आहे ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांची परिस्थिती तर भयावह आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेला कामगार आणि असंघटित कामगार यांच्या उत्पन्नातील तफावत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. द्रुतगतीने वाढणारी महागाई, अगणित बेकारी, आणि सरासरी जीवनमानाची खालची पातळी या संदर्भात ही वाढती तफावत विशेष बाब झाली बाहे.

परिस्थितीने लाचार म्हणून संघटित नाही, संघटित नाही म्हणून आपली परिस्थिती सुधारण्यासाठी काही दबाव नाही, आणि दबाव नाही, म्हणून अस्तित्वात असलेल्या कायद्याचाही काही आधार मिळत नाही, अशी ही अवस्था आहे. अशा या असंघटित कामगारांच्या मनातील भीती व लाचारी कशी दूर करावी, हा खरा प्रश्न आहे. नेहमीच्या चाकोरीत आणि नीतिनियमांत हे काम साधणारे नाही. व्यवहारी बुद्धीने, काटेकोर विचार करून ही अवस्था दूर होणारी नाही. असंघटिताना संघटित करण्याचे प्रश्न धसास लावण्याचे काही ठिकाणी तुरळक प्रयत्न चालू आहेत. पण समस्येचे एकूण स्वरूप लक्षात घेता ते फारच अपुरे आहेत, परिणामकारक नाहीत. दबलेल्या कामगाराची मानसिक बैठक तयार करण्यासाठी सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा ठोस कार्यक्रम घेऊन निदान महाराष्ट्रात तरी आंदोलन उभारण्याच्या दिशेने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात एका क्षेत्रात समानता आहे. महागाई सर्वत्र सारखी आहे. मग तो शहरी भाग असो, निमशहरी असो वा ग्रामीण असो. म्हणून मागणी रास्त आहे. पण कायद्यानं न्यूनतम वेतन ठरवतानाही राज्याचे तीन-चार विभाग पाडले जातात. ग्रामीण भागात कारखाने जातात तेव्हा नफा वाढवण्यासाठी वेतनावर होणारा खर्च कमीत कमी व्हावा, या इराद्याने पण या वास्तव मागणीचाही पाठपुरावा करायचे म्हटले तरी आजच्या समाजाचे तथाकथित आधार असलेले व स्वत:ला पुरोगामी म्हणवणारे अनेक त्यास कसून विरोध करणार आहेत. मोठाल्या कारखान्यात काम करणारा कामगार आपल्या गावच्या शेतावरील मजुराला कमीत कमी वेतन मिळावं म्हणून धडपडत असतो. पण कारखान्यात आपल्या वेतनात सुखसोई वेतन वाढत राहावे म्हणून आंदोलन करत असतो. यावरून समान किमान वेतनाच्या मागणीत येणारे हे असे अडथळे तर जीवनावश्यक इतर गरजांच्या मागण्यांबाबत कसे अडथळे येतील आणि कुणाकडून येतील त्याची कल्पना करता येते. कामगार चळवळीचे बरेचसे लक्ष हे संघटित उद्योगधंद्यांतील कामगारांवर केंद्रित झाले आहे. कारण या चळवळीवर संघटित व मोक्याच्या ठिकाणी असलेल्या उद्योगधंद्यांतील मोठ-मोठाल्या संघटनांचा व त्यांच्या नेत्याचा प्रभाव आहे चळवळीचे नेतृत्व करणारे नेते हे या अशा संघटनांतीलच आहेत. त्यांना आपल्या संघटनांकडेच बहुतांशी लक्ष पुरवावे लागते. देशातील एकूण वातावरणाचा परिणाम या मोठमोठ्या संघटना स्वयंकेंद्रित बनण्यात झाला आहे. त्यामुळे जी आंदोलने केली जातात ती बहुतांशी संघटित कामगारांच्या प्रश्नांसाठी, ज्यांनी काही कमावले आहे, त्यांना जास्त मिळावे म्हणून. या आंदोलनास ओघाओघाने कमजोर व असंघटित कामगारांसाठी जे काही साधता येईल ते साधण्याचा फक्त प्रयत्न होतो. शिवाय जिथे संघटित कामगारांची जिथे फुटीर प्रवृत्ती आहे तिथे असंघटितांसाठी जे काही थोडे चालले आहे तिथेही या फुटीर प्रवृत्तीची तीव्र झळ लागतेच आहे. महाराष्ट्राच्या जिल्ह्या जिल्ह्यातून ठिकठिकाणी काम करीत असलेल्या कामगार व त्यांच्या बाजूने उभे राहू शकणाऱ्या संघटकांनी एकत्र येऊन जर सामूहिकपणे काही ठोस कार्यक्रम अंमलात आणायचे ठरवले व त्यावर आधारित आंदोलन उभारणे शक्य झाले तर आजच्या कमजोर व असंघटित कामगारांच्या प्रश्नांना हात घालता येईल. ही एक प्रक्रिया आहे, काही जिल्हा केंद्रात तिने मूळ धरले तर ती जोरात सुरू होईल. संघटित कामगारांना या आदोलनांस सहाय्य करता येईल. जिल्ह्या जिल्ह्यात जसे वातावरण तयार होईल तसे स्थानिक पातळीवरही सहाय्य मिळेल. स्थानिक नेतृत्व सत्तेच्या राजकारणापासून दूर राहाण्याची तयारी दाखवतील, तेव्हाच हे साध्य होईल.

# गोदरेज कामगारांचा भव्य लढा

**अनिल गणाचार्य यांच्या आठवणीतून - भाग ३**

ऑक्टोबर २००१ चे दिवाळीचे दिवस होते. विक्रोळी येथील गोदरेज कंपनीतील हंगामी कामगारांना कामावरून कमी करण्यात आले होते. जवळपास अडीच हजार कामगार दिवाळीच्या दिवसात बेकार झाले. यात अनेक सुशिक्षितदेखील होते. आयटीआयचा कोर्स करून ते तिथे काम करत होते. व्यवस्थापनाने अचानक पगारामध्ये कपात केल्यामुळे कामगारांनी आंदोलन केले होते. कंपनीमध्ये अंतर्गत युनियन होती. पण ती कायमस्वरुपी असलेल्या कामगारांसाठी लढायची. हंगामी कामगारांचा प्रश्न सोडविण्यास ती तयार नव्हती. म्हणून तिथले एक हजार कामगार श्रमिक उत्कर्ष सभेचे सदस्य झाले.

गोदरेज ही नावाजलेली कंपनी असल्यामुळे सरकार दरबारी त्याचे वजन होते. शासनदेखील त्यांच्याशी नरमाईनेच वागायचे. एकाबाजूला कामगार संघटना वाटाघाटी व्हाव्या, यासाठी प्रयत्नशील होत्या तर दुसऱ्या बाजूला न्यायालयीन लढाईदेखील सुरुच होती. अडीच हजार कामगारांचा प्रश्न सोडविण्याची ती धडपड होती. कामगार न्यायालयात संघटनेला यश आले. डिसेंबर २००१ मध्ये न्यायालयाने निर्णय दिला की, कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्यात यावे. या निर्णयामुळे कामगार आनंदी झाले.

युनियनच्या वतीने ठरविण्यात आले की, प्रत्येक कामगाराने न्यायालयाचा आदेश घेऊन कंपनीत जावून काम मागायचे. १ जानेवारी २००१ रोजी सकाळी सातच्या ठोक्याला कामगार कंपनीच्या नेहमीच्या ठिकाणी एकत्र गोळा झाले. विजय कांबळे, कृष्णा मोकल आणि मी कामगारांना मार्गदर्शन केले. कामगार शिस्तीने कंपनीच्या प्रवेशद्वारावर जमले होते. पण कंपनीने गेट बंद केले. गेटवर कंपनीचे सुरक्षा कर्मचारी जमले होते. ते काही कामगारांना आत सोडण्यास तयार नव्हते. कांबळे आणि मोकल यांच्या मार्गदर्शनानंतर त्यांच्या सूचनेनुसार मी तिथे कामगारांसमवेत होतो. कामगारांना आत सोडत नाही, हे पाहून गेटवर गलका सुरु झाला. सुरक्षा अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले. काही वेळाने ते आल्यानंतर कामगारांची भूमिका त्यांना सांगण्यात आली. कामगारांकडे असलेला न्यायालयाचा आदेशदेखील दाखवून कामावर घेण्याची विनंती केली. त्यांनी व्यवस्थापनाशी चर्चा करून कामगारांना आत घेतले आणि तिथे बसण्यास सांगितले. मात्र काहीतरी वेगळेच कारस्थान शिजले होते.

कामगार शांतपणे गेटच्या आतमध्ये बसले होते. सर्वजण एकत्र जमले होते. तितक्यात पोलिसांचा फौजफाटा तिथे आला. दोन वायरलेस गाड्या आणि मोठ्या प्रमाणावर पोलिसांची कुमक आली. त्यांनी आत शांत बसलेल्या कामगारांना बाहेर हाकलण्यास सुरूवात केली. अनेकांना धक्काबुक्की केली. कामगार ऐकत नव्हते म्हणून लाठीमार केला. त्यात अनेकजण जखमी झाले. अनेकजण लाठीमार चुकविण्यासाठी कंपनीच्या आवारात इकडेतिकडे जिवाच्या आकांताने सैरभर धावू लागले. त्यात काही चिडलेल्या कामगारांनी कंपनीच्या परिसरातील व्यवस्थापनाच्या गाड्याची तोडफोड करण्यास सुरूवात केली. काहीजण कारखान्यात शिरले. तिथे लाईनवर असलेले फ्रीज त्यांनी ढकलून दिले. त्या प्रत्येकाच्या मागे पोलिस हात धुवून लागले होते. जवळपास ५०० कामगारांना त्यांनी कंपनीच्या बाहेर काढले होते.

मी ताबडतोब कांबळे आणि मोकल यांना फोन करून प्रसंगाची माहिती दिली. त्यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे छगन भुजबळ उपमुख्यमंत्री होते आणि त्यांच्याकडेच गृहमंत्री पद होते. काँग्रेसचे कृपाशंकर सिंग हे गृह राज्यमंत्री होते. कृपाशंकर सिंग यांना मोबाईल फोन करून त्यांना मी सगळी परिस्थिती सांगितली. त्यांनी ताबडतोब उपायुक्तांना परिस्थितीची पाहणी करण्यास पाठवले. उपायुक्त श्री. बिपीन यांनी सोबत अतिरिक्त पोलिस फौज फाटा आणि गाड्या मागवल्या होत्या. ते आल्यानंतर पोलिसांनी सर्व कामगारांना घेराव घातला आणि काही कळायच्या आत सर्वांना अटक करण्यात येत असल्याचे जाहीर केले. कामगारांना पोलिस वाहनांमध्ये बसवून घाटकोपर पोलिस कोठडीत डांबण्यात आले. सर्व कामगारांना वाहनात नेत असताना मी त्यांना धीर देत होते.

पोलिस कोठडीत त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. पण मला पोलिसांनी कुणालाही भेटू दिले नाही. विजय कांबळे यांना काळाचौकी पोलिस ठाण्यात जबानी घेण्यासाठी बोलावण्यात आले आणि संध्याकाळपर्यंत बसवून ठेवले. नंतर त्यांना अटक केल्याचे जाहीर केले.

दुसऱ्या दिवशी दोघांनीही परिस्थितीचा आढावा घेतला. युनियनचे कार्यालय बंदच ठेवण्यात आले होते. विजय कांबळे यांच्यासमवेत एकूण ८५० कामगारांना अटक करून गुन्हे दाखल करण्यात आल्याची नोंद होती. पण प्रत्यक्षात ४११ जणच होते, असे समजले होते. एवढ्या कामगारांना घाटकोपर पोलिस ठाण्यात ठेवता येणे शक्यच नव्हते म्हणून त्यांची रवानगी ठाणे आणि नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली. या सर्वांची सुटका करणे हा फार मोठा प्रश्न मोकल व माझ्यापुढे होता विजय कांबळे यांचा मोठा मुलगा भुपेंद्र कांबळे यांचा जवळचा मित्र संजय मुत्रेजा हे मदतीला आले. त्यांनी ताबडतोब वकील नंदकुमार शेट्ये यांच्या मदतीने प्रयत्न सुरु केले. रात्रीचे कोर्ट बंद असल्यामुळे रात्रीचे मॅजिस्ट्रेट यांच्या घरी जाण्याचे ठरले. वरळी येथील मॅजिस्ट्रेट यांच्या घरी जावून जामिनासाठी अर्ज करण्यात आला. त्यांनी वैयक्तिक जामीन मंजूर केला आणि सर्वांना बॉण्ड लिहून देण्यास सांगितले. रातोरात बॉण्ड पेपर कुठे मिळणार, हा प्रश्न होता. अशावेळी भुपेंद्रने ठाणे येथील स्टॅम्प पेपर विक्रेत्याच्या घरी जावून ते मिळवले. ह्या सर्व धावपळीत एक दिवस उलटून गेला होता. दुसऱ्या दिवशी २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन असल्यामुळे सर्व व्यवहार बंद होते. शेवटी तिसऱ्या दिवशी बॉण्ड पेपर सादर करण्यात आले. त्यानंतर विजय कांबळे आणि त्यांच्यासमवेत असलेल्या कामगारांची सुटका झाली. त्यावेळी ठाणे कारागृहात अरुण गवळीदेखील होते. त्यांनी कांबळेची आस्थेने विचारपूस केली होती.

मोकल आणि माझ्यावर अटक वॉरंट असल्यामुळे ते तीन दिवस फरार होते. तोपर्यंत अटकपूर्व जामिन मिळवण्यासाठी त्यांनी सेशन कोर्टात अर्ज केला. त्यांच्यासमवेत सहआरोपी म्हणून मधुमती पोटभरे नावाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महिला आघाडीची एक कार्यकर्ती होती. त्यांना कामगार संघटनेचे काम करण्याची आवड होती. त्यामुळे दहा दिवसांपूर्वीच संघटनेत सामील झाली होती. गोदरेज कंपनीच्या गेट मिटिंगला त्या दिवशी आल्यामुळे त्यांनाही सहआरोपी करण्यात आले होते. अटक होणार या भीतीने त्या घाबरल्या होत्या. त्यांना फरार राहण्यासाठी हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांचे हॉटेलचे बिल वाढत होते. धावपळीत त्यांच्याकडे लक्ष देणेही अवघड होत होते. तरीही त्यांचे बिल भरून त्यांना नंतर पाठविण्यात आले.

अटकपूर्व जामिनासाठी ॲड. मजिद मेमन यांची नेमणूक केली होती. त्यांनी न्यायालयात बाजू मांडली होती. पण मोकल आणि मला यांना जामिन नाकारला गेला. त्यामुळे उच्च न्यायालयात अपील करण्यात आले. तिथे ॲड. मेमन यांनी युक्तिवाद करून जामिन मंजूर करून घेतला. मात्र, न्यायालयाने काही अटी घातल्या. एक आठवडा दररोज पाकर्साईट पोलिस ठाण्यात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हजेरी लावायची. पोलिस चौकशीला सामोरे जायचे, अशा त्या अटी होत्या.

श्री. कांबळेची ठाणे मध्यवर्ती कारागृहातून सुटका झाल्यानंतर इतर कामगारांनाही नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह येथून सोडण्यात आले. त्यानंतर विक्रोळी कोर्टात केस सुरु झाली. अनेक वर्षे तारखा पडत होत्या. १५ वर्षांनंतर केस सेशन कोर्टात गेली. आता २१ वर्षे झाली तरी केस उभी राहिली नाही. ४१३ व्यक्तींची एफआयआरमध्ये नावे नोंद आहेत. ८५० पैकी ४१३ आरोपी आहेत. त्यापैकी १५० ते १७५ कामगार अजूनही येतात. अनेक न्यायाधीश बदलले. पण जोपर्यंत सर्व आरोपी येत नाहीत तोपर्यंत केस चालवता येत नाही, असे न्यायालयाकडून सांगण्यात आले. जे कामगार येत नाहीत, त्यांच्यावर वॉरंट बजावण्यात आले. पण पोलिस ठाण्यात त्यांचे पत्ते सापडत नाहीत. त्यांना वॉरंट बजावता येत नाही. वकिलांनी न्यायालयाला विनंती केली की, जे कामगार उपस्थित राहतात, त्यांची केस वेगळी करा आणि जे अनुपस्थित आहेत, त्यांना वॉरंट बजावून वेगळे करावे. कारण येणाऱ्या कामगारांचा दरवेळचा रोजगार बुडतो. काही लोकांना गावावरून यावे लागते. आता नवे न्यायाधीश नक्कीच याचा विचार करतील, अशी आशा कामगारांना आहे. दरम्यानच्या काळात विजय कांबळे आणि कृष्णा मोकल यांचेही निधन झाले. कामगार पोरका झाला आहे. संघटनेत आलेल्या नव्या नेतृत्वाचे आपल्याकडे दुर्लक्ष होत असल्याची कामगारांची भावना आहे. परिस्थिती बिकट असूनही मार्ग काढण्याच्या दृष्टीने मी अजूनही प्रयत्नशील आहेत.

(क्रमशः)

## नोकरीसाठी पदवी सोबतच कौशल्य हवे...


रितू भारद्वाज मोईत्रा

एक कंपनी आहे जी पदवी सोबतच कौशल्यांवर आधारित लोकांना कामावर ठेवते

सुमारे पाच दशकांपूर्वी स्थापन झालेल्या मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील ड्युरोफ्लेक्स हा गाद्या, सोफा, बेड आणि स्लीप ॲक्सेसरीजचा व्यवसाय करत आहे. कॉर्पोरेट कार्यालयाचे मुख्यालय बेंगळुरू येथे असून, कंपनीचे होसूर आणि करियामंगलम (तामिळनाडू), इंदूर (मध्य प्रदेश), हैदराबाद (तेलंगणा) आणि पाला (केरळ) येथे सात उत्पादन सुविधा आहेत.

रितू भारद्वाज मोईत्रा, मुख्य मानव संसाधन अधिकारी, ड्युरोफ्लेक्स, कंपनीच्या 'नो बार ऑन मिनिमम एज्युकेशन पॉलिसी' किंवा कौशल्य-आधारित नोकरी धोरण आणि अनोख्या स्लीप पॉड्स प्रोग्रामबद्दल सांगतात. ड्युरोफ्लेक्समध्ये 'किमान शैक्षणिक धोरणावर कोणताही अडथळा नाही' असे तीन मार्ग आहेत:- ब्लू-कॉलर व्यावसायिकांची नियुक्ती, विभागांमध्ये अंतर्गत गतिशीलता आणि क्रॉस-फंक्शनल हस्तांतरण, आणि केस-टू-केस आधारावर संपूर्ण कौशल्य-आधारित नियुक्ती. संस्थेची सुरुवात झाल्यानंतर कंपनीने नियुक्ती 'किमान शिक्षणावर नो बार' द्वारे सुरू केली.

मोईत्रा म्हणतात, 'प्रारंभिक कल्पना समाजाला मदत करत होती आणि त्या सर्व लोकांना संधी प्रदान करत होती जे किमान किंवा मूलभूत शिक्षणदेखील घेऊ शकत नाहीत, अगदी ५ वी किंवा ६ वी पर्यंत.' तर, कारखान्यातील कामगार किंवा दुकानातील कामगारांना या पद्धतीने कामावर घेतले जात होते आणि अजूनही ठेवले जात आहे. कंपनीने अलीकडेच एका डिजिटल आर्टिस्टची (ग्राफिक डिझायनर) नियुक्ती केली आहे. जो २० वर्षांचाही नाही आणि तरीही त्याच्याकडे उत्तम कौशल्ये आहेत.

कंपनीने नुकतीच एक भरती प्रक्रिया राबवली. ज्यात एमबीए-एचआर किंवा किमान पात्रता म्हणून कोणतीही कार्य पात्रता नाही. संस्थेतील सुमारे ६० टक्के नियुक्ती कर्मचारी संदर्भाद्वारे होते आणि उर्वरित ४० टक्के सल्लागार आणि लिंकेडइन, नोकरी.कॉम आणि लाइक्स सारख्या समाज माध्यमांद्वारे होते.

१८ मार्च पासून संस्थेने एक नवी पद्धत लागू केली आहे. जी बेंगळुरूमधील कॉर्पोरेट कार्यालयातील सर्व कायम कर्मचाऱ्यांना ३ किंवा ४ तास काम केल्यानंतर झोपू देते. 'आम्हाला मानवी शरीरविज्ञान आणि स्क्रीनसमोर चार किंवा पाच तास कठोर परिश्रम केल्यानंतर आणि एका विशिष्ट स्थितीत खुर्चीवर बसल्यानंतर झोपण्याची गरज समजते,' असे मोईत्रा म्हणतात.

कंपनीतील आणखी एक महत्वाचा उपक्रम म्हणजे शुक्रवारी, प्रत्येकजण काम करताना त्यांचे झोपतानाचे कपडे (नाईट सूट आणि पायजामा) घालतो. आरामाच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी आरामशीरपणे काम करण्यास तेच सक्षम होण्यासाठी हा एक सराव आहे.


# सामाजिक सेवा, पत्रकारिता, सरकारी कर्मचारी ते मंत्र्याचे स्वीय सहाय्यक-यशाची चढती कमान

सामाजिक सेवेतून, पत्रकारिता, सरकारी कर्मचारी ते कॅबिनेट मंत्र्याचे स्वीय सहाय्यक अशी यशाची चढती कमान असलेले हरहुन्नरी व्यक्तीमत्त्व म्हणजे ॲड. विकास गोरखनाथ रोकडे शासनाच्या कामगार विभागात कार्यरत आहेत. आंबेडकरी चळवळीचा गड असलेल्या बुध्द कॉलनी, कुर्ला पश्चिम या झोपडपट्टीत त्यांचे बालपण गेले. त्यामुळे बालपणीच आंबेडकरी चळवळीची बीजे मनात रोवली गेली होती.

वडील गोरखनाथ नावजी रोकडे मिल कामगार होते. कुटुंबात चार मुली व एक मुलगा असा परिवार होता. वडिलांच्या मिलचा संप झाल्यावर आई वडिलांनी मिळेल ते काम करून आपल्या मुलांना शिक्षण दिले. आई शारदा रोकडे यांनी दुसऱ्यांच्या घरची धुणी-भांडी करून व वडिलांनी मिळेल ते काम करून मुलांचे शिक्षण केले. आईवडिल अशिक्षित असून आणि अर्थिक परिस्थिती प्रतिकूल असूनही शिक्षण दिले.

विकास रोकडे यांचे प्राथमिक शिक्षण मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण जनरल एज्युकेशन इंस्टिट्यूट प्राथमिक शाळा कुर्ला हायस्कूल येथे झाले. कायद्याचे पदवीचे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेकर महाविद्यालयातून झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना पत्रकारितेची आवड निर्माण झाल्याने शिक्षणासोबत पत्रकारिता सुरू केली. मुंबईतील विविध दैनिके व नियतकालिकांमध्ये काम करीत पत्रकारितेचे प्रशिक्षण घेतले.

१९९७ साली रमाबाई आंबेडकर नगर घाटकोपर, मुंबई येथे झालेल्या दलित


ॲड. विकास गोरखनाथ रोकडे

हत्याकांडाचं त्यांनी वृत्तांकन केले व त्या घटनेचा मनावर खोल परिणाम झाला व ते आपोआपच आंबेडकरी चळवळीत कार्यरत झाले. विभागात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात काम करीत असताना ३५ जोडप्यांचा सामूहिक विवाहाचा भव्य दिव्य असा कार्यक्रम रोकडे यांनी घडवून

नोंद

आणला. त्याचवेळी 'प्रति प्रहार टाइम्स' पाक्षिक सुरू केले.

१९९८ साली कला शाखेच्या शेवटच्या वर्षाला असताना मुंबईतील दलित हत्याकांड असा प्रबंध सादर केला. या प्रबंधास २० पैकी १८ गुण मिळाले होते. पत्रकारितेची आवड होती. परंतु त्या क्षेत्रात आर्थिक स्थैर्य नसल्याचे जाणवले व घरच्या परिस्थितीचा विचार करून पत्रकारिता सोडण्याचा निर्णय घेतला. नंतर एका विनाअनुदानित शाळेत लिपिक पदाची नोकरी स्वीकारली. आज ना उद्या काही तरी होईल. या आशेवर ४ वर्ष बिनापगारी अशा प्रकारेच नोकरी केली, पण शेवटी कंटाळून ही नोकरी सोडली. शासकीय नोकरी कोणत्याही स्वरूपाची असली तरी चालेल पण मिळवायची ही जिद्द मनात होती. निघालेल्या प्रत्येक जाहिरातीचा अर्ज भरत. परीक्षा देत राहिले. पण यश येत नव्हते. शेवटी २००८ साली त्यांच्या प्रयत्नांना यश आले व महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागात त्यांनी नोकरी मिळविली. या विभागात सेवा करत असताना २०२० साली महाराष्ट्र मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री यांचे स्वीय सहायक म्हणून काम करण्याची संधी रोकडे यांना मिळाली.

कोविड काळात कॅबिनेट मंत्र्याचे स्वीय सहाय्यक या नात्याने अनेकांचे प्राण त्यांनी वाचविले आहेत. दूरध्वनीवरून संपर्क साधणाऱ्या गरजवंतांच्या अडचणी सोडविण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. गौतम बुध्द श्रध्दास्थान असलेल्या फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीशी ते निष्ठावंत आहेत. रोकडे यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- नासिकेत पानसरे**
**९९३०९९८९७८**

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

**(Chief Minister Employment Generation Programme- CMEGP)**

**राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने युवक/युवतींना उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे. हा या योजनेचा उद्देश आहे.

ही योजना पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेकरिता (maha-cmegp.gov.in) हे ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेते खाली DLTFC समितीमार्फत शिफारस करण्यात येते. राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) यांच्या मान्यतेने एकूण २३ सार्वजनिक क्षेत्रातील बँका व ११ खाजगी क्षेत्रातील तसेच १४ सहकारी बँकांचा समावेश या योजनेत आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये :-**

- उत्पादन उद्योग, कृषी पूरक उद्योग व सेवा उद्योग प्रकल्प योजनेंतर्गत लाभासाठी पात्र.
- उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पासाठी, सेवाक्षेत्रातील आणि कृषी आधारित/प्राथमिक प्रकल्प मर्यादा २०-५० लाख रुपये आहे.
- एकूण लक्षांकापैकी किमान ३० टक्के महिला लाभार्थी व किमान २० टक्के अनुसूचित जाती/जमाती.
- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील उमेदवार विशेष प्रवर्गासाठी ५ वर्षाची अट शिथिल.
- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु. २५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास असावे.
- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या / महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :**

- प्रकिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा / कृषी पूरक उद्योग / व्यवसायसाठी कमाल रु. २० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :**

अ) शहरी भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र

ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय

**पात्र मालकी घटक :**

वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट, एकल मालकी कंपनी (OPC) व मर्यादित दायित्व संस्था (LLP).

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग- (मार्जिन मनी-अनुदान) :**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयं गुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरुपातील) आर्थिक सहाय्य याव्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के अर्थसहाय्य बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका व १४ जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका इत्यादींमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थीची निवड :**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्णः ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी होत आहे. यासाठी अर्जदारांसाठी विशेष CMEGP पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध आहे. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजूर प्रकल्प किंमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्ष कालावधीसाठी LOCK-IN राहील. प्रकल्पाची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाल्याची खात्री झाल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :**

योजनेंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजूर झालेल्या अर्जदारांसाठी निशुल्क निवासी स्वरुपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येईल. हे प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषी पूरक उद्योग, व्यवसायांसाठी एक आठवडा मुदतीचे असेल.

**आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / वयाचा पुरावा/ शैक्षणिक पात्रते संबंधिचे कागदपत्रे / प्रमाणपत्रे.
- आधार कार्ड
- नियोजित उद्योग / व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल.
- जातीचे प्रमाणपत्र
- विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक)
- वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना.
- स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)संगणकीय प्रणालीवर सीएमईजीपी पोर्टल सीएमईजीपी पोर्टल (CMEGP PORTL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत कागदपत्रांसोबत अर्जासोबत सादर करावी.

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे : -**

जिल्हा स्तरावर सीएमईजीपी CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडे ऑनलाईन अर्ज केल्यानंतर महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी केली जाते. प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी तयार झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस केली जाते.

आवश्यक शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय घेतला जातो. प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर केलेल्या शासनाच्या अनुदान (मार्जिनमनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी दिली जाते. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरणाचे निर्देश दिले जातात. अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर पूर्ण कर्ज वितरण होते.

**अधिक माहिती व संपर्क :**

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२.
फोन - ०२२-२२६२३६१, २२६२२३२२, १८६०२३३२०२८,
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा)
जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ :**

www.maitri.mahaonline.gov.in
www.di.maharashtra.gov.in

## अधिकारी घरी येतील; योजनांचा लाभ देतील

**सोलापूर** : दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात दिव्यांगांच्या दारी शासन हा उपक्रम राबविला जाणार आहे. सोलापूर जिल्ह्यातही जून किंवा जुलै महिन्यात हे अभियान राबविले जाणार असून, दिव्यांग व्यक्तींपर्यंत शासन पोहोचणार असून, यूडीआयडी कार्ड घरपोच मिळण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

समाजकल्याण विभागामार्फत जिल्हास्तरावर सदर शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात शासनाचे सर्व विभाग, सर्व शासकीय यंत्रणा, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्था एकाच ठिकाणी दिव्यांगांच्या तक्रारी जाणून घेतील.

## रिक्त पदांमुळे योजनांची अंमलबजावणी रखडली

**रामटेक** : सुदृढ बालक आणि कुपोषणमुक्त राज्य यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्पाद्वारे विविध योजना राबविण्यात येतात. रामटेक येथील कार्यालयात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याने या योजनांची अंमलबजावणी रखडली असून, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या ऐरणीवर आल्या आहेत.

रामटेक कार्यालयातील बालविकास प्रकल्प अधिकारी कर्णेवार यांची काही महिन्यांपूर्वी बदली करण्यात आली. त्यांच्या जागी अद्याप पूर्णवेळ अधिकाऱ्याची नियुक्त करण्यात आली नाही. या पदाचा प्रभार सोपवितेवेळी महाभारत झाले. शेवटी वरिष्ठ असलेल्या माया पाटील यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. योजनांची अंमलबजावणी व कार्यालयाचे काम ज्या वेगाने व्हायला हवे, त्या वेगाने होत नसल्याने विविध अडचणी निर्माण होत आहेत असे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

रामटेक वगळता सर्व तालुक्यांना या कार्यालयांतर्गत देण्यात येणारा निधी देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सर्व कार्यक्रमांचा निधी मार्च २०२३ मध्ये प्राप्त झाला होता. परंतु, अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे बिले न सादर केल्याने हा निधी परत गेला, अशी माहिती अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दिली. हा निधी पुन्हा प्राप्त झाला असला तरी तो मिळण्याची शक्यता कमी असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.



## कामा रुग्णालयात सेवानिवृत्तीचा भावपूर्ण सोहळा

**मुंबई** : कामा व आल्बलेस रुग्णालयातील चंद्रावती चंद्रकांत देसाई आणि धनगौरी पुरुषोत्तम बारिया या दोघी महिला कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती सोहळा नुकताच भावपूर्ण वातावरणात पार पडला. कामा व आल्बलेस रुग्णालयातील कर्मचारी, अधिकारी वर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. तुषार तात्याबा पालवे तसेच स्त्री रोग पथकप्रमुख डॉ. कुरडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सत्यनारायण, अधिपरिसेविका सिस्टर मेहर, सिस्टर कुरधुंडकर, सिस्टर पवार, सिस्टर पाचपुते, सिस्टर वरक, सिस्टर निगवेकर, सिस्टर चांदोसकर, राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस बाबाराम कदम, परिचारिक श्रीमती केणी व श्रीमती नलावडे तसेच मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आपल्या कार्यकाळात चंद्रावती देसाई तसेच धनगौरी बारिया या दोन्ही महिला कर्मचाऱ्यांनी रुग्णालयाला दिलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रुग्णांविषयी असलेला त्यांचा सेवाभाव तसेच कर्मचारी वर्गाशी असलेले सलोख्याचे संबंध यांच्या आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला.

## उपमुख्याधिकारी ठरले एक ग्रॅम सोन्याचे मानकरी

**उमरेड** : लोकमत सखी मंच व सोबती मानवसेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित अभिनव अशा सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत उमरेड पालिकेचे उपमुख्याधिकारी आकाश सहारे व राणी सहारे हे एक ग्रॅम सोन्याचे मानकरी ठरले. भरगच्च उपस्थितीत शानदार ठरलेल्या कार्यक्रमात प्रियंका व कौस्तुभ पवार यांनी द्वितीय क्रमांकाचा चांदीचा ग्लास तसेच तृतीय क्रमांकाचे वंदना व मंगेश गिरडकर यांनी १ ग्रॅम गोल्डन प्लेटेड दागिना बक्षीस पटकावले.

या उपक्रमाबद्दल तसेच त्यात केलेल्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या गुणांना यातून प्रोत्साहन आणि वाव मिळाल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. पंडित दीनदयाल उपाध्याय नाट्यसभागृहात झालेल्या कार्यक्रमाला आमदार राजू पारवे, माजी नगराध्यक्ष गंगाधर रेवतकर, प्रा. कवी अनंत राऊत, अशोक मने, दिलीप सोनटक्के, विलास रायपूरकर, सतीश चौधरी, पूजा खानोरकर आदींची उपस्थिती होती. यावेळी शिवम झोडे या गुणवंत विद्यार्थ्यासह मयूरी व नेहा झोडे या दोन बहिणींचाही सत्कार करण्यात आला.

सामान्यज्ञान स्पर्धेत निशिता व पवन खवास, अलका व डॉ. हर्षल रेवतकर, त्रिवेणी व रमेश खांबाळकर, वैशाली व संजय बांदरे, उषा व विनायक सातपुते, निधी व संध्या बेले, कल्पना व सुधाकर बेले यांना प्रोत्साहनपर पारितोषिके मिळाली.

## जिल्हा परिषद आवारात कर्मचाऱ्यांकडून वृक्षारोपण

**जालना** : जागतिक पर्यावरण दिनाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या परिसरात सीईओ वर्षा मीना यांच्या संकल्पनेतून अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ३११ रोपांची लागवड केली.

जिल्हा परिषदेच्या परिसरात विविध विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वखर्चातून झाड खरेदी करणे, ते कुंडीत लावणे व त्याचे स्वतःचे नाव लावून सादरीकरण करणे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार कार्यालयात कार्यरत असलेल्या ३११ कर्मचाऱ्यांनी झाडांची लागवड केली. यानंतर परिसरामध्ये प्लास्टिक कचरा संकलन केले.

## सहायक वनसंरक्षकांना खासदारांनी धरले धारेवर

**चोपडा** : शहरासह तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेली अवैध वृक्षतोड व त्याची दिवसाढवळ्या केली जात असलेली वाहतूक यावर पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची दखल घेत खासदार रक्षा खडसे यांनी थेट जिल्हाधिकारी अमन मित्तल यांच्याकडे दूरध्वनीद्वारे तक्रार केली. तसेच चोपडा वन विभागाचे सहायक वनसंरक्षक पी. व्ही. हडपे यांना धारेवर धरत कानउघाडणी केली.

राजरोसपणे अवैध वृक्षतोड सुरू असून तुम्ही त्याकडे दुर्लक्ष का करता? तुमचा वृक्षतोडीला पाठिंबा आहे का की तुमचे लागेबांधे आहेत? याला आळा का घातला जात नाही? येत्या आठवडाभरात वृक्षतोड बंद न झाल्यास मी आंदोलनाला बसेल, असा सज्जड दमच खासदार रक्षा खडसे यांनी सहायक वनसंरक्षक पी. व्ही. हडपे यांना दिला आहे.

चोपडा तालुक्यासह शहरात अवैध वृक्षतोड गेल्या अनेक दिवसांपासून राजरोसपणे सुरू आहे. त्यासोबतच रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठमोठ्या वृक्षांना आग लावून त्यांची कत्तल केली जात आहे. त्याचबरोबर याबाबत कुठल्याही प्रकारचा अंकुश प्रशासनाकडून नाही, त्यामुळे परिसरातील नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. या वृक्षतोडीबाबत कुठलेही आदेश नसताना तसेच ते नियमबाह्य असूनही संबंधित यंत्रणा त्याची दखल घेत नसल्याचे याबाबत आढळून आले आहे.

तरीदेखील याबाबत तक्रार केली तर वन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग एकमेकांकडे बोट दाखवत असून प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहत असल्याने या सर्व गोष्टीला अधिकाऱ्यांचाच पाठिंबा आहे का, अशी शंका व्यक्त होत आहे. याबाबत पत्रकारांनी खासदारांना प्रश्न विचारला असता त्यांनी वृक्षतोडबाबत थेट जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करून चोपडा वन विभागाचे सहायक वनसंरक्षक पी. व्ही. हडपे यांची कानउघाडणी केली. तसेच यापुढील काळात अशाप्रकारचे कृत्य होणार नाही, याची काळजी घेण्यास बजवले.

## लोकप्रतिनिधींची आयुक्तांना 'ॲलर्जी'!

**अमरावती** : विभागातील पाच जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रमुख असलेल्या विभागीय आयुक्तांविषयी सामान्य माणसासह आता लोकप्रतिनिधीही संताप व्यक्त करू लागले आहेत. सामान्य माणसाच्या समस्यांचे निदान तर दूर त्यांना भेटण्याची तसदीही विभागीय आयुक्त घेत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. इतकेच नव्हे तर लोकप्रतिनिधींनाही भेटण्याची त्यांना ॲलर्जी असल्याची तक्रार थेट मुख्य सचिवांकडे केली आहे. अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम आणि अकोला जिल्ह्यांचा कारभार अमरावती विभागीय कार्यालयातून चालतो.

## ८२ वाढीव पदे:सेवा प्रवेश नियम 'आरआर'ला मिळणार मान्यता

**अमरावती** : महापालिकेच्या बहुप्रतीक्षित आकृतिबंधास मान्यता मिळण्याची वाट सुकर झाली आहे. प्रशासनाने नवनिर्मित ८२ वाढीव पदांसह २२८५ पदांच्या मान्यतेचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला. तद्वतच, सेवाप्रवेश नियम मान्यतेच्या प्रतीक्षेत आहेत. हा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर व्हावा आणि नवी भरती व्हावी, यासाठी सर्वजण प्रतिक्षेत आहेत.

अमरावती महापालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील अनावश्यक पदे रद्द करणे, आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कामकाजासाठी पदनिर्मिती करणे, यापूर्वीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या २२३१ पदांपैकी २८ पदे रद्द करणे, पूर्वीची २२०३ पदे कायम ठेवणे व नव्याने आवश्यक ८२ पदांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) नुसार निर्मिती करण्यास मान्यता देण्यासह एकत्रित २२८५ पदांच्या आकृतिबंधास मान्यतेचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला आहे. मान्यतेसाठी आयुक्तांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे जोरकस पाठपुरावा चालविला आहे. लवकरच त्याला यश येईल तसेच पुढील कार्यवाहीदेखील जलद होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## दुर्लक्षित घटकांच्या दारी आला मागासवर्ग आयोग

**जालना** : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे आणि प्रा. डॉ. नीलिमा सरप यांनी घनसावंगी तालुक्यातील रवणा परंडा, परतूर तालुक्यातील वैजोडा आणि जाफराबाद तालुक्यातील भातोडी या गावास प्रत्यक्ष भेट देऊन तेथे वास्तव्यास असलेल्या मुस्लिम उंटवाले व वायंदेशी कुणबी जात समूहाच्या कुटुंबाशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग आयोगाचे अधिकारी मेघराज भाटे समाज कल्याणचे सहायक आयुक्त, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

## पैसा मिळाला, खर्च नाही; २०७ कोटी अखर्चितच !

**नागपूर** : जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) अंतर्गत मंजूर निधी जिल्हा परिषदेला दोन वर्षांत खर्च करता येतो. मात्र, शासन स्थगितीमुळे ९ महिने विकासकामे थांबली. त्यात निधीही थांबविण्यात आला होता. मार्च महिन्यात कामे करण्याला मंजुरी मिळाली; परंतु एका महिन्यात निधी खर्च करणे शक्य नव्हते. परिणामी, २०२२-२३ या वर्षातील २०७ कोटींचा निधी अखर्चित राहिला. हा निधी दोन वर्षांत खर्च करता येत असल्याने शासनाकडे परत जाणार नाही. मात्र, मागील निधी अखर्चित असल्याने वर्ष २०२३-२४ मध्ये मागणीनुसार निधी मिळणार नाही.

स्थगितीमुळे वर्ष २०२१-२२ मधील कामे थांबली होती. दुसरीकडे वर्ष २०२२-२३ मधील निधी फेब्रुवारीपर्यंत मिळाला नव्हता. परिणामी, जि.प.च्या काही विभागाचा एक रुपयाही खर्च झाला नाही. २०२२-२३ या वर्षात जिल्हा नियोजनकडून ३१३ कोटी प्राप्त झाले. यातील ९८.३७४ कोटीचा निधी खर्च झाला, अशी माहिती जि. प.च्या वित्त विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. निधी अखर्चित असल्याने याचा जिल्ह्यातील विकासकामांवर परिणाम झाला आहे

## आरोग्य अभियानात समावेशाची मागणी

**लातूर** : राष्ट्रीय आरोग्य अभियानमधील कंत्राटी कर्मचारी व गटप्रवर्तकांचे काम एक समान आहे. त्यामुळे गटप्रवर्तकांचा कंत्राटी कर्मचाऱ्यांत समावेश करण्यात यावा, यासह अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य मिशन गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख, राज्य संघटक दत्ता देशमुख, यांच्यासह गटप्रवर्तकांची मोठी उपस्थिती होती. आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे यांना दिले.

## तलाठी कार्यालयातून रजिस्टर गहाळ;९ वर्षांपासून कामे रखडली

**जाफराबाद** : तालुक्यातील नांदखेडा गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मालकी हक्काला केलेल्या बदलाची नोंद असणारे तलाठी कार्यालयातील फेरफार रजिस्टर गहाळ झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रजिस्टरचा पत्ता लागत नसल्याने शेतकरी त्रस्त आहेत. गावातील अनेक शेतकऱ्यांनी शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी तसेच अन्य कामासाठी फेरफार नक्कलीसाठी तलाठी कार्यालयात अर्ज केला आहे. परंतु, फेरफार नोंद रजिस्टर गहाळ झाल्याने त्या मिळत नाहीत. याबाबत नीता गंगावणे यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली आहे.

जाफराबाद तहसीलची स्थापना होऊन ४१ वर्षे झाली आहेत. तालुक्यात १०१ गावांचा समावेश आहे. या गावातील व्यवहाराची तसेच सातबारावर केलेल्या नोंदीचे रेकॉर्ड तलाठी कार्यालयात झालेले आहे. मात्र, नांदखेडा गावाचे फेरफार नोंद रजिस्टर गेल्या अनेक वर्षांपासून गहाळ झाले आहे. त्याचा शोध अद्याप लागलेला नाही. या प्रकरणी तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार करूनही रजिस्टरचा शोध लागलेला नाही.

## शिक्षक भरती न झाल्यास आंदोलन

**गोंदिया** : राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त असलेली शिक्षक पदे शासनाने ३१ जुलैपूर्वी शंभर टक्के भरावीत अन्यथा या मागणीकडे लक्ष यासाठी संघटनेच्या वतीने आझाद मैदानावर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा महत्वाचा ठराव नुकत्याच झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत सर्वानुमते करण्यात आला.

विजय भोगेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील होते. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या विषयी चर्चा झाली.

## वनअधिकाऱ्यांच्या बदलीत मनमानी झाल्याची तक्रार

**मुंबई** : वनविभागातील २०० हून अधिक अधिकाऱ्यांच्या बदल्या या मनमानी पद्धतीने झाल्याची तक्रार सत्ताधारी भाजपच्या आमदारांकडूनच करण्यात आली. आपल्या आमदारांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या बदल्यांना तत्काळ स्थगिती दिली आहे. झालेल्या बदल्यांची तपासणी करूनच बदल्या केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रधान मुख्य वनसंरक्षक वाय.एस.पी. राव आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिश्वास यांच्याकडून बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. यामध्ये शेकडो वनसंरक्षकांबरोबरच, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचाही समावेश होता, या बदल्यांसंदर्भात अकोल्याचे आमदार रणधीर सावरकर, ॲड. आशिष जयस्वाल (रामटेक), संदीप धुर्वे (आर्णी) व राम सातपुते (माळशिरस) यांनी आक्षेप घेत वनमंत्री मुनगंटीवार यांना पत्र पाठवून लक्ष वेधले होते.

काही आमदारांनी अधिकाऱ्यांविषयी गंभीर तक्रारी केल्या आहेत म्हणून सगळी माहिती घेऊन चौकशी करा. कुठेही शंका असेल तर कारवाई करा, अशा सूचना दिल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले.

## सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत; शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला यश

**अहमदनगर** : विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी यांना ३१ मे रोजी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत चालू करण्याचे आदेश शासनाने निर्गमित केले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाच वर्षांच्या संघर्षाला यश आले असल्याची माहिती अहमदनगर जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ अध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे, सचिव संतोष कानडे यांनी दिली.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत सुरू झाल्याने शिक्षकेतरांची वसुली थांबेल व वेतनवाढ होऊन पेन्शनधारक शिक्षकेतर कर्मचारी यांनादेखील लाभ होणार आहे. सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना १५ फेब्रुवारी २०११ व २८ डिसेंबर २०१० च्या शासननिर्णय आदेशानुसार सुरू झाली होती. परंतु, वित्त विभागाची परवानगी न घेता शासन आदेश लागू केल्याने ७ डिसेंबर २०१८ व १६ फेब्रुवारी २०१९ शासन आदेशानंतर रद्द करण्यात आली होती. यानंतर राज्यातील सर्व संघटना एकत्रित येऊन सेवक संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून एकत्र आल्या व त्यांनी कामबंद, लाक्षणिक संप, बेमुदत संप, निदर्शने, मोर्चे, आंदोलने केली. जवळपास पाच वर्षांच्या संघर्षानंतर हे यश प्राप्त झाले असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

हा आदेश निर्गमित होण्यासाठी उमरगा मतदार संघाचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनी प्रयत्न केले. तसेच वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने आभार मानण्यात आले. हा लढा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे मुख्य संघटक अजय देशमुख, महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन, संदीप हिवरकर, केतन कान्हेरे, अंकुश आनंदा, पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### 'कर्मचारी टाइम्स' चे कार्यालयीन प्रतिनिधी

१. भाऊसाहेब पठाण
२. सुरेश आहेरकर
३. अशोक शिंदे
४. छाया करे
५. रिध्दी कुबल
६. गुरुदत्त वाकदेकर

## वर्गणीदारांसाठी सूचना

१. **'कर्मचारी टाइम्स'** अंकाची वार्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वतःचे नाव, पत्ता सुवाच्य अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. **'कर्मचारी टाइम्स'** चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. **'कर्मचारी टाइम्स'** चे अंक किरकोळ विक्रीसाठी **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क** : राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.
**संपर्क** : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६
**ईमेल** : karmacharitimes@gmail.com
**वेबसाईट** : www.karmacharitimes.com

## आवाहन

**'कर्मचारी टाइम्स'** मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे. **संपर्क संपादक : 'कर्मचारी टाइम्स', द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२. भ्रमणध्वनी: ९८९०९१६५८८**
**ईमेल : karmacharitimes@gmail.com**

♦♦♦

## नवीन नियमांना कामगारांच्या हितासाठी मान्यता

**मुंबई** : केंद्र शासनाने सर्व २९ कामगार कायदे एकत्र करून ४ कामगार संहिता तयार केल्या असून आज व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता, २०२० या चौथ्या संहितेस राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. नवीन कामगार नियमांना मान्यता दिल्याने लाखो कामगारांचे हित जपण्यात आले आहे.

व्यावसायिक सुरक्षा आरोग्य आणि कामाची स्थिती संहितेस मान्यता देण्यात आली आहे. यातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे:- १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये उपहारगृह बंधनकारक, २५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात कल्याण अधिकारी, ५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात पाळणा घर अशा काही तरतुदी असतील.

यापूर्वी वेतन संहिता, २०१९, औद्योगिक संबंध संहिता, २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० या ३ संहितांच्या नियमांना राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाने १९९९ मध्ये माजी केंद्रीय कामगार मंत्री रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नेमला होता. या आयोगाने सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करून या ४ कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. या ४ संहिता अधिनियम संसदेने पारित केले आहेत.

कामगार हा विषय समवर्ती सूची मध्ये समाविष्ट असल्याने केंद्र शासनाने सर्व राज्यांसाठी एकत्रित संहिता तयार केली आहे. सर्व संहितांची अंमलबजावणी सर्व राज्यांमध्ये एकत्रितरित्या करावयाची असल्याने राज्यांनी संबंधित संहितांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियम पारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र शासनाने व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता अधिनियम, २०२० प्रसिध्द केले आहेत.

या अधिनियमात राज्यांना समुचित शासन व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती (कामगार) संहिता नियम तयार करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार या संहितेस मान्यता देण्यात आली आहे.



कुसुम बबन म्हस्के



मीना कांती बोरीचा

## कामा रुग्णालयात सेवानिवृत्ती कार्यक्रम

**मुंबई** : कामा व आल्ब्लेस रुग्णालयातील कुसुम बबन म्हस्के आणि मीना कांती बोरीचा यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम ३० जून २०२३ रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला होता.

यावेळी अधीक्षक डॉ. तुषार तात्याबा पालवे, राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे राज्य सचिव बाबाराम कदम, निवासी वैद्यकीय अधिकारी सुनीता सत्यनारायण, मेट्रन डोंगरे तसेच कर्मचारी आणि अधिकारी वर्ग उपस्थित होते. मान्यवरांनी निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी उत्तमोत्तम शुभेच्छा दिल्या.

आपल्या कारकिर्दीत कुसुम म्हस्के आणि मीना बोरीचा यांनी रुग्णालयातील रुग्णांची सेवा केली असून त्यांच्या कार्यशैलीमुळे त्या रुग्णांमध्ये तसेच कर्मचारी वर्गांमध्येही लोकप्रिय होत्या. मनमिळाऊ तसेच सहकारी वृत्तीमुळे त्यांच्याबद्दल कर्मचारी तसेच जनमानसात त्यांना आदर आहे.

## नोकरी शिपायाची... रांग मात्र नेट, एम.फिल., पदवीधरांची

**छतरपूर** : एका विद्यापीठात शिपाई पदासाठी भरती करण्यासाठी अर्ज मागवण्यात आले असता, चक्क नेट आणि एम.फिल. उत्तीर्ण असलेल्यांनी नोकरीसाठी रांग लावल्याचा प्रकार बुंदेलखंड विद्यापीठात घडला आहे. यामुळे देशातील बेरोजगारीचे भयानक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ १६ पदांवर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची भरती करत आहे. ८ मेपर्यंत अर्जदारांकडून अर्ज जमा करण्यात आले आहेत. यावेळी एम.फिल. आणि नेट उत्तीर्ण उमेदवारही शिपाई होण्यासाठी रांगेत उभे राहिले आहेत.या पदांवर भरती होण्यासाठी १७९७ जणांनी अर्ज सादर केले आहेत. शिपाई पदासाठी ८वी पास शिक्षण गरजेचे असतानाही ८०० पदवीधर, ४०० पदव्युत्तर पदवी असलेल्या उमेदवारांसह एम. फिल. आणि नेट पात्र उमेदवारांनी देखील या नोकरीसाठी अर्ज सादर केले आहेत. सध्याच्या काळात नोकरीची आवश्यकता विचारात घेता आता उच्च शिक्षित विद्यार्थी अथवा बेरोजगारदेखील शिपायाच्या नोकरीसाठी तयार झाल्याचे चित्र दिसून येते. दरम्यान या भरतीसाठी कुलसचिव डॉ.एस.डी.चतुर्वेदी यांनी सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

## भा. का. कर्मचारी महासंघ अध्यक्षपदी दिलीप जगताप

**मुंबई** : भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या कार्यकारिणी सभेमध्ये नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून दिलीप जगताप यांच्या नियुक्तीची घोषणा आमदार भाई जगताप यांनी केली. अॅड. शशिकांत पवार आणि दिलीप जगताप यांनी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या माध्यमातूनच भारतीय कामगार कर्मचारी महासंघाची स्थापना १९८९ साली केली होती. तेव्हापासून दिलीप यांनी महासंघाचे सचिव म्हणून कामकाज पाहिले. महासंघाचे अध्यक्ष अॅड. शशिकांत पवार यांचे निधन झाल्यानंतर महासंघ अध्यक्षपदी दिलीप जगताप यांची नुकतीच नियुक्ती झाली होती. जगताप यांची नियुक्ती झाल्याने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



## वांद्रे येथे नागरी स्वास्थ केंद्राच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

**मुंबई** : नागरी स्वास्थ केंद्र, आरोग्य संघटना, वांद्रे यांच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन २६ जून रोजी प्रा. उषा रंगनाथ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी नागरी स्वास्थ केंद्राचे काम उत्तम चालले आहे. ते असेच चालू ठेवा, अशा शुभेच्छा दिल्या.

सदर संघटना राज्याध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या नेतृत्वाखाली कार्य करत आहे. उद्घाटनप्रसंगी राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबईचे संघटक विश्वास रणदिवे व मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेचे सचिव शशिकांत एन. सकपाळ, जे जे हॉस्पिटल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ राणे आणि नागरी स्वास्थ्य केंद्र चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भगवान कदम, उपाध्यक्ष शोभा बाबू पवार, सरचिटणीस दिनेश जगन्नाथ भाग्यवंत, खजिनदार श्वेता सुरेश कांबळे तसेच अन्य पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.


## सदावर्तेंच्या पॅनलचा एसटी बँक निवडणुकीत विजय

**मुंबई** : स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑप. बँकेच्या निवडणुकीत अॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्या एसटी कष्टकरी जनसंघाच्या पॅनलने सर्व १९ जागांवर एकतर्फी विजय मिळवला आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार पुरस्कृत एसटी कामगार संघटनेच्या पॅनलचा दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे आंदोलनानंतरही एसटी कर्मचाऱ्यांवर सदावर्तेंची जादू कायम असल्याचे दिसून आले.

एसटी विलिनीकरणाच्या आंदोलनात उडी घेणारे गुणरत्न सदावर्ते पहिल्यांदाच निवडणुकीला सामोरे जात होते पंचवार्षिक निवडणुकीत १५० हून अधिक उमेदवार रिंगणात होते. खरी चुरस सदावर्ते पॅनल आणि शरद पवार पुरस्कृत संदीप शिंदे यांच्या कामगार संघटनेच्या पॅनलमध्ये झाली.

६५ हजार मतदारांपैकी ५८ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकारी संस्था मुंबई शहरचे जिल्हा उपनिबंधक नितीन काळे यांच्या नेतृत्वात मतमोजणी रविवारी (२५ जून) सकाळी ९ वाजता सुरू झाली, सोमवारी (२६ जून) सायंकाळी ५ वाजता निवडणूकीचे अंतिम निकाल घोषित झाले. पाच प्रवर्गातील सर्वसाधारण प्रवर्गामध्ये १४, महिला प्रतिनिधी म्हणून २, अनुसूचित जाती / जमाती १, इतर मागास १, भटक्या विमुक्त जाती / जमाती विशेष मागास प्रवर्ग १ असे एकूण १९ संचालक पदी सदावर्ते पॅनलचे उमेदवार निवडून आले.

एसटी महामंडळात प्रस्थापित असलेल्या आणि गेल्या अनेक दशकांपासून काम करणाऱ्या सर्व कामगार संघटनांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला आहे. दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र एसटी कामगार संघटना, तिसऱ्या क्रमांकावर भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांची सेवा शक्ती संघर्ष संघटना, चौथ्या क्रमांकावर एसटी वर्कर्स काँग्रेस (इंटक), पाचव्या क्रमांकावर शिवसेना (उबाठा) - भाई जगताप यांची काँग्रेस - कास्ट्राईब यांच्या युतीचे पॅनल, सहाव्या क्रमांकावर अपक्षांचे पॅनल आणि सातव्या क्रमांकावर बाळासाहेब ठाकरे (शिवसेना) सचिव किरण पावसकर यांच्या



राष्ट्रीय कामगार सेनेला समाधान मानावे लागले आहे. त्यामुळे सर्वच संघटनांवर आत्मचिंतनाची वेळ आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून एसटी कामगारांच्या महागाई भत्ता, पगार वाढीपासून अनेक प्रश्न प्रलंबित होते. मात्र हा प्रश्नांची सोडवणूक करण्यात प्रस्थापित कामगार संघटनांचे नेतृत्व अपयशी ठरले. कामगारांच्या प्रश्नांवर व्यापक आंदोलनही झाले नाही. याचा फायदा सदावर्ते, आमदार गोपिचंद पडळकर यांच्या नव्याने स्थापन झालेल्या संघटनांनी घेतला. सातवा वेतन आयोग आणि एसटी विलिनिकरणाच्या मुद्यावरुन पाच महिने संप पुकारलेला संप यशस्वी झाला नाही, मात्र कामगारांच्या प्रश्नांवर आम्ही लढत असल्याचे ठसवून देण्यात सदावर्ते यशस्वी झाले. त्यामुळे निवडणूकीत त्यांच्या पनलला विजय मिळवून दिला.

हा वैचारीक लढा होता. ही निवडणूक सामान्य कष्टकऱ्यांच्या न्यायासाठी होती. शरद पवारांच्या काळात ड्रायव्हर, कंडक्टर, मेकॅनिक यांच्या हातात कधीच सत्ता नव्हती. आम्ही भाकरी फिरवत नाही तर झणझणीत फोडणी देतो. त्यामुळे पवार पुरस्कृत संघटनेचा पराभव करून आम्ही विजय मिळवला आहे, अशी प्रतिक्रिया अॅड. गुणरत्न सदावर्ते (एसटी कष्टकरी जनसंघ) यांनी दिली.

संविधान न मानणाऱ्यांसाठी कुठलेच नियम अस्तित्वात नाहीत. त्यामुळे राष्ट्रिपता महात्मा गांधी यांचा अपमान करणाऱ्यांची, नथुराम गोडसेंचा जयजकार करणाऱ्यांची हिंमत वाढली आहे. तसेही मुर्खासाठी आणि लोकशाही न मानणाऱ्यांसाठी नियम नसतात. त्यामुळे असली विधाने करणारी व्यक्ती विशिष्ट विचारधारेची असेल तर पोलिस गप्प बसतात, असे सूचक विधान अॅड. असीम सरोदे यांनी केले.

आतापर्यंत अॅड. गुणरत्न सदावर्ते हे पूर्वीच्या संघटनांच्या नावाने अपयशाचे खापर फोडत होते. त्यामुळे सदावर्ते यांची आता बँक योग्य पद्धतीने चालवताना खरी कसोटी लागणार आहे.

## एसपींची तंबी फळली

**अमरावती** : पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी २४५ पोलिस अंमलदारांची खांदेपालट केली. त्याचवेळी बदलीप्राप्त अंमलदारांना कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले ३१ मे पर्यंत संबंधित अंमलदार कार्यमुक्त होऊन बदलीस्थळी रुजू होणार नाहीत, त्या ठाणेदारांनी १ जून रोजी मुख्यालयाशी संलग्न व्हावे, अशी तंबी एसपी बारगळ यांनी दिली होती. अवघ्या दोन दिवसांत ९० टक्के अंमलदार रुजू झाले आहेत.

## एनटीसीच्या गिरणी कामगारांना थकबाकी मिळणार

### पियुष गोयल यांची ग्वाही

**मुंबई** : एनटीसीच्या गिरणी कामगारांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. या पगाराची थकबाकी लवकरच देण्यात येणार असून त्यांच्या मागण्याही तातडीने पूर्ण करण्यात येतील, अशी स्पष्ट ग्वाही केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी दिली.

मार्च २०२० पासून एनटीसी गिरण्या बंद आहेत. या कामगारांना पूर्ण पगार देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असताना, अर्धा पगार दिला जात आहे. गेल्या सहा महिन्यांपासून तोही पगार दिला गेला नाही. दरम्यान, गिरणी कामगार आंदोलनाच्या पवित्र्यात होते. याबाबतची बातमी कानावर येताच एनटीसी गिरणी कामगारांवर त्यांच्या कुटुंबियांवर हलाखीची परिस्थिती ओढवू नये, तसेच कामगारांच्या मागण्या त्वरित पूर्ण व्हाव्यात, थकीत पगारापोटीचे पैसे तातडीने मिळावेत, याकरिता मुंबई भाजपा अध्यक्ष, आमदार अॅड. आशिष शेलार यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांच्याशी संवाद साधला.

यावेळी गोयल यांनी केंद्र सरकार एनटीसी गिरणी कामगारांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दर्शवत सर्व मागण्या तातडीने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. याआधी मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या नऊ गिरण्यांच्या जमिनींवरी ११ चाळींच्या पुनर्विकासाची पुढाकार घेतला.

## विजेचा वाढला लपंडाव

**नागपूर** : मानेवाडा, आशीर्वादनगर, वंजारीनगर, बैरामजी टाऊन तर एक दिवसापूर्वी सुभाषनगर व पूर्व नागपुरातील बहुतांश भागात विजेचा लपंडाव होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दुसरीकडे मात्र महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मस्त झोपा घेत आहेत. कॉल सेंटर केवळ नावाचेच राहिले आहे. कार्यालयात गेल्यावर लोकांना समाधानकारक उत्तरही मिळत नाही.

## कंत्राटी कामगारांसाठी इंटकने घेतली आयुक्तांची भेट

**नेरुळ** : नवी मुंबई महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या मागण्या प्रशासकीय स्तरावर प्रलंबित आहेत. नवी मुंबई इंटक अध्यक्ष म्हणून या प्रश्नावर वेळोवेळी पाठपुरावा करूनही संबंधित विभागाने कोणतेही निर्णय घेतले नाहीत. त्यामुळे कामगारांमध्ये महापालिकाविरोधात असंतोष निर्माण होत असून या मागण्या त्वरित मार्गी लावाव्यात, अशी मागणी इंटक अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांना भेटून केली.

या मागण्यांत प्रामुख्याने कंत्राटी कामगारांना ८ दिवसीय किरकोळ रजा लागू करण्यासंबंधी निर्णय जारी केला असून त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. कोपरखैरणे पाणीपुरवठा विभागातील कंत्राटदाराने कामगारांना १ जानेवारी २०२० पासून आजपर्यंतची वाढीव पगारातील थकबाकी अंदाजे ८ ते ९ हजार प्रत्येकी दिलेली नाही. मनपातील ८ हजार कामगारांच्या वेतनातून किमान वेतन कायद्यानुसार कपात केली जाते. परंतु काही कंत्राटदारांकडून हाच पैसा भविष्य निर्वाह निधीकडे जमा केला जात नाही व सुविधांच्या नावाखाली वेतन कपात केले जाते.

त्याबाबतीत ज्या सुविधा मिळणे गरजेचे आहे, त्यांना त्या दिल्या जात नाहीत. त्याचबरोबर कामगारांच्या अन्य मागण्यांकडेही यावेळी लक्ष वेधण्यात आले. आयुक्तांनी त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले.

## मोबाइल शोधण्यासाठी अखखा बंधारा केला रिकामा

**कांकेर** : एखादा मोबाइल किती महत्त्वाचा असू शकतो? छत्तीसगढच्या कांकेर जिल्ह्यातील सरकारी अधिकाऱ्याने बुडालेल्या मोबाइलच्या शोधात धरणाच्या बाहेरील भागातून तब्बल ४१ लाख लिटर पाणी उपसून वाया घालवल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका फोनसाठी सलग तीन दिवस, दीड हजार एकर शेतजमीन सिंचनाखाली आली असती इतके पाणी उपसण्यात आले. हे प्रकरण उघडकीस येताच जिल्हाधिकारी प्रियंका शुक्ला यांनी अहवाल मागवला आणि अधिकाऱ्याला निलंबित केले.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील पखंजूर भागात धरणाच्या बाहेरील बाजूस साचलेले सुमारे ४१ लाख लिटर पाणी उपसल्याबद्दल अन्न निरीक्षक राजेश विश्वास यांना निलंबित करण्यात आले. आपल्या मित्रांसह परिसरातील परळकोट जलाशयाला भेट देण्यासाठी गेले होते. त्यावेळी सेल्फी घेत असताना त्यांचा सॅमसंग गॅलेक्सी एस २३ हा मोबाइल चुकून खोल पाण्यात पडला. चार दिवसांनी अधिकाऱ्यांचा मोबाइल सापडल्याचे त्यांनी सांगितले

## बलकवडे यांचा सत्कार

**कोल्हापूर** : कोल्हापूर पालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांची नियमानुसार बदली झाल्याने त्यांना महापालिकेत सत्कार करून निरोप देण्यात आला. हा सत्कार अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसुळ व उप-आयुक्त शिल्पा दरेकर यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहात करण्यात आला. यावेळी प्रशासकांना महालक्ष्मीची प्रतिमा व रोप देण्यात आले. प्रशासक बलकवडे यांनी कोणत्याही अधिकाऱ्यांवर अथवा कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ दिला नाही. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करून कर्मचाऱ्यांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

### निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी आता पेन्शन अदालत !

## दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी दरबार; केडीएमसी आयुक्तांचा निर्णय

**डोंबिवली** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती विषयक प्रश्न झटपट मार्गी लागावे, तसेच निवृत्ती वेतन मिळविण्यासाठी त्यांना महापालिकेत फेऱ्या माराव्या लागू नयेत, याकरिता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन अदालत आयोजित करण्याचा निर्णय आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी घेतला आहे.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन कार्यक्रम संपल्यानंतर सकाळी साडेदहा वाजता पेन्शन अदालत घेतली जाणार आहे. या अदालतीमध्ये सहभागी निवृत्त कर्मचारी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर २ प्रतीमध्ये पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे जमा करणे बंधनकारक आहे. आयत्यावेळी कोणतीही तक्रार अदालतीमध्ये स्वीकारली जाणार नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. पेन्शन विषयक तक्रार वैयक्तिक स्वरुपाची असावी, असे म्हटले आहे.

## कंत्राटी पदभरतीतही आरक्षण द्या : भुजबळ

**नागपूर** : कंत्राटी तत्त्वावर पदभरती होत आहे. या कंत्राटी पदभरतीतही आरक्षण द्या, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिबिराचे आयोजन महात्मा फुले सभागृहात करण्यात आले. याच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. ओबीसींच्या जनगणनेवरुन भाजपाला लक्ष्य केले. ते म्हणाले, की ओबीसींची जनगणना झाली पाहिजे. जुन्या सरकारच्या काळात ते झाले. परंतु या मोदी सरकारने ते आकडे जाहीर केले नाही. ओबीसींची जनगणना झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

## कंत्राटींमुळे ३९ हजार मागासवर्गीयांवर अन्याय

### अध्यक्ष एस. आर. भोसले यांची खंत

**छत्रपती संभाजीनगर** : राज्य सरकारने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात ७५ हजार नोकर भरती कंत्राटी पद्धतीने करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे ३९ हजार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग आणि ओबीसी समाजातील सुशिक्षित बेरोजगारांवर अन्याय होणार असल्याची खंत बहुजन अधिकारी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष एस. आर. भोसले यांनी कल्याण येथील पदाधिकाऱ्यांच्या अधिवेशनात व्यक्त केली.

अधिवेशनाचे उद्घाटन महेंद्र साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. श्रीमंत कांबळे यांनी केले. रजेच्या विषयावर सूर्यकांत धनावडे, सेवानिवृत्तीच्या विविध प्रकारांवर अरुण सोनवणे, भारतीय कामगारांचे भाग्यविधाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर पुणे विभागाचे अध्यक्ष विजयकुमार कांबळे, प्रशासकीय कामकाजाबाबत एम. जी. कांबळे आणि सेवा पुस्तकात असणाऱ्या विविध त्रुटींबाबत सुभाष कदम यांनी मार्गदर्शन केले. विविध प्रश्नांवर समाधान धांडे, सिद्धोदन गजहंस (औरंगाबाद), सुभाष बगाटे (हिंगोली), सुहास गायकवाड (उस्मानाबाद), अधिकराव देठे (विटा), आदिप गायकवाड (पुणे), अमरचंद सूर्यवंशी (ठाणे), नाना त्रिभुवन (नाशिक), डॉ. डी. एम. आखाडे (धुळे), चंद्रकांत पोळ, अरुण भालेकर, श्याम लगाडे आणि गोविंद जावळे (सातारा) आदींनी मनोगत व्यक्त केले.

## वनक्षेत्रपालांच्या बदल्यांना लागला 'ब्रेक'

**नाशिक** : वनविभागातील काही वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या मुख्य वनसंरक्षकांच्या आदेशान्वये दोन दिवसांपूर्वी करण्यात आल्या होत्या. या बदल्यांबाबत शासनाकडे काही लोकप्रतिनिधींकडून गंभीर स्वरूपाच्या तक्रारी करण्यात आल्या. यामुळे बदल्यांचे निर्गमित केलेले आदेश उपसचिव भगवान सावंत यांनी रद्द केले असून राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांना पत्र पाठविले आहे. यामुळे नाशिक आरएफओ विवेक भदाणे यांच्याही बदलीला पुढील आदेशापर्यंत स्थगिती मिळाली आहे.

वनविभागातील वर्ष २०२३ अखेरच्या नियमित व विनंती बदल्यांचे आदेश मुख्य वनसंरक्षकांकडून २८ मे रोजी काढण्यात आले होते. या आदेशात नाशिक वनवृत्तातील एकूण पाच वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. यामध्ये नाशिक वनपरिक्षेत्राची सूत्रे अहमदनगर अकोले येथील वृषाली गाडे यांच्याकडे देण्यात आली होती, तसेच भदाणे यांची बदली नाशिक पूर्व विभागातील सप्तश्रृंगी गडावर करण्यात आली होती. दिलीप हिरे यांची अकोला येथे बदली करण्यात आली होती.

## सीमाशुल्क विभाग उपायुक्तांना अटक

**मुंबई** : केंद्रीय अन्वेषण विभागाने दोन वेगवेगळ्या प्रकरणांच्या तपासादरम्यान सीमाशुल्क विभागाच्या उपायुक्त दिनेश फुलदिया आणि सुभाष चंद्रा या दोन उपायुक्तांना अटक केली. याप्रकरणी सीबीआयने मुंबई, नवी मुंबईसह सात ठिकाणी शोध मोहीम राबवली असून त्यांना सीबीआय कोठडी दिली आहे.

## अग्निशामक जवानांनी केली मंदिराची स्वच्छता

**देहूगाव** : आषाढी वारी श्री संत तुकाराम महाराजांच्या ३३८ व्या पालखी सोहळ्याची देहू नगरपंचायतीच्या व संस्थानच्या वतीने जोरदार तयारी सुरू आहे. नगरपंचायतीने तळेगाव दाभाडे नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाडीच्या मदतीने संत तुकाराम महाराज मंदिराचा बाहेरील परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी तळेगाव नगरपालिकेच्या तीन कर्मचाऱ्यांनी हे काम केले. यावेळी देहू नगरपंचायतीचे वरिष्ठ लिपिक महेश वाळके यांच्यासह चार कर्मचारी उपस्थित होते. अग्निशमन दलाच्या वाहनाने मुख्य मंदिराचे महाद्वार व परिसर, उत्तर दरवाजा, पालखीचा रथ व पालखी रथाचा मंडप, तपोनिधी नारायण महाराजांचे समाधी मंदिर, मंदिराच्या व इंद्रायणी नदीकडे जाणाऱ्या पायऱ्या, आंबेडकर चौकातील चौदा टाळकरी कमान व देहूगावातील दक्षिणेकडील प्रवेशद्वार कमान, भैरवनाथ मंदिर, दर्शनबारी परिसर पाण्याचे फवारे मारून धुण्यात आला. त्याचबरोबर मंदिर परिसरही स्वच्छ करण्यात आला आहे.

# कामगार संघटनांनी एकत्र येऊन निर्णायक लढा उभारावा

## कामगार नेते आमदार सचिन अहिर यांची रोखठोक मुलाखत

केंद्र सरकारने कामगारांचे खच्चीकरण करणारे कामगार विरोधी धोरण स्वीकारले आहे. राज्य सरकारनेही केंद्राच्याच पावलावर पाऊल ठेवून कामगार वर्गाला रस्त्यावर आणले आहे. या विरोधी सर्व कामगार संघटना एकत्र येऊन लढत आहेत. पण सरकारने वरुन कामगार कल्याणाचे गोडवे गात मलकशाहीला चुचकारणारे धोरण सुरूच ठेवले आहे, या विरुद्ध पुन्हा कामगार संघटनांना एकत्र येऊन निर्णायकपणे लढावे लागेल, अशी रोखठोक भूमिका राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांनी 'कर्मचारी टाइम्स'ला मुलाखत देताना मांडली आहे.

सरकारी कर्मचारी, संघटित, असंघटित कामगार वर्गाच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'कर्मचारी टाइम्स'ने मान्यवर कामगार नेत्यांच्या मुलाखती आयोजित केल्या आहेत. सरकारी धोरणातून कामगार वर्गात कमालीची अस्वस्थता पसरली आहे. यावर कामगार नेते म्हणून आपली भूमिका काय? या प्रश्नावर आमदार सचिनभाऊ अहिर यांनी वरील मुलाखतीत आपले सडेतोड विचार मांडले आहेत.

**केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलांना अनेक कामगार संघटनांनी कडाडून विरोध केला आहे, आपण काय सांगाल?**

सरकारच्या कृतीचा खरपूस समाचार घेताना शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)चे उपनेते, प्रवक्ते, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस आणि पुणे जिल्ह्याचे संपर्क प्रमुख आमदार सचिनभाऊ अहिर म्हणाले, कामगार संघटनांचा विरोध असतानाही केंद्र सरकारने 'फोर लेबर कोड बिल' लोकसभेत खासदार संख्येच्या जोरावर अखेर मंजूर केले. राज्यसभेतही अनेक खासदारांनी त्याला कडाडून विरोध केला, पण सत्तेच्या जोरावर तेथेही सदस्यांचे काहीच चालू न देता ही विधेयके मंजूर केली गेली आहेत. सर्व केंद्रीय कामगार संघटनांनी वर्ष-दोन वर्षापेक्षाही अधिक काळ त्या विरुध्द लढा उभा केला.पण सरकारने उद्योगपतींना तारक आणि कामगारांना मारक ठरलेले धोरण मागे घेतले नाही, तसेच राज्य सरकारनेही केंद्राची ही विधेयके स्वीकारून कामगारांना रस्त्यावर आणले आहे. मागील महाआघाडी सरकारने केंद्राने बदललेले कायदे न स्वीकारण्याचे जाहीर केले होते. परंतु आजच्या विद्यमान सरकारने केंद्राचा भाऊबंदकीचा धर्म पाळण्यासाठी हे कायदे स्वीकारले आहेत. तसे करताना औद्योगिक कामगारांच्या म्हणण्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. तेव्हा कामगार आणि कामगार चळवळीच्या अस्तित्वाच्या या लढाईत सर्व कामगार संघटनांना आता पुन्हा एकतेची वज्रमूठ अधिक घट्ट करावी लागेल आणि उग्र लढ्यासाठी कंबर खोचावीच लागणार आहे!

**केंद्र सरकारच्या कामगार कायद्यातील 'फिक्स टर्म कॉन्ट्रॅक्ट पद्धती' ला कामगार संघटनांकडून जोरदार आक्षेप घेतला जात आहे. त्या बद्दल आपण काय सांगाल?**

या कायद्याला सर्वत्र विरोध होतो आहे ते बरोबर आहे. 'फिक्स टर्म कॉन्ट्रॅक्ट पद्धती'त कायद्याने मालक कुठल्याही कामगाराशी व्यक्तिगत करार करू शकतो. तो सहा महिने, वर्ष, पाचवर्षाचा करार करू शकतो. मालक त्याला पाच वर्षांपर्यंत नोकरी देऊ शकतो. या पाच वर्षाच्या आत मालक त्याचे काम संपल्यावर केव्हाही काढू शकतो. परंतु सदर कामगार पाच वर्षाच्या आत नोकरी सोडू शकत नाही. याचा अर्थ कुठल्याही कंपनीत कायम कामगार दिसणार नाहीत. म्हणजे आजवरची 'कायम कामगार'ही संज्ञाच नष्ट होईल. युनियन बनविण्याचा अधिकार आता मालकांना देण्यात आला आहे. संघटना बनविण्यापूर्वी परवानगी घ्यावी लागणार आहे. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेतून दिलेले अधिकार काढून घेतले जाणार आहेत, हे दुर्दैव आहे. त्या विरुद्ध लढावे लागेल.

**बेकारीच्या प्रश्नावर कामगार संघटनांकडून ओरड केली जाते आहे. त्यावर आपली काय भूमिका आहे?**

बेकारी, बेरोजगारीचा प्रश्न खूपच चिंताग्रस्त करणारा आहे. त्यातच राज्यात येऊ घातलेली कारखानदारी दुसऱ्या राज्यात गेली आहे. अनेक छोटे-छोटे कारखाने अद्याप सुरूच झालेले नाहीत. राज्यातील बंद एनटीसी गिरण्यांच्या प्रश्नावर आम्ही महाराष्ट्रासह राष्ट्रीय पातळीवर



लढा उभा केला. पण केंद्राची मानसिकता उद्योग पुर्ववत चालविण्याची दिसत नाही. सर्वच सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करून, देश आऊट सोर्सिंगवर चालविण्याचा सरकारचा डाव आहे काय?

नुकतेच महाराष्ट्र औद्योगिक सुधारणा विधेयक राज्यपरिषदेत चर्चेसाठी आले. त्याला आमदार म्हणून आम्ही सडकून विरोध केला आहे. एखाद्या गुन्ह्यात कारावासाची सजा करण्याऐवजी दंडात्मक कारवाई करण्याची सुधारणा येत असेल तर पुर्वापारच्या कायद्याचे दातच काढून टाकल्या सारखे आहेत, मग कायद्याचे राज्य कसे रहाणार? उद्योग बंद करण्यासाठीची पूर्वीची अट काढून मालकांच्या पथ्यावर पडेल अशी कायद्यात तरतूद करण्यात आली तर कामगारांच्या रोजंदारीचे काय? असंघटित कामगारांची परिस्थिती तर ना घरका ना घाटका, अशी झाली आहे. महाराष्ट्र शासनाने संमत केलेला, नवा महाराष्ट्र कामगार कायदा खरंतर कामगारांना गुलाम करणारा आहे. नवा कामगार कायदा कार्पोरेट कंपन्या, उद्योजकांना खूश करणारा आहे. कामगारांना केव्हाही कामावरून काढून टाकले जाईल, अशी आज परिस्थिती आहे. कामगार न्यायालये बंद करून लवाद नेमण्याचा निर्णय घेतला गेला आहे. पण त्यातून उद्योजकांवर जो पूर्वी कायद्याचा धाक होता तो रहाणार आहे का? महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. परंतु राज्य सरकारची सध्याची कृती, नाव सोनूबाई आणि हाती मात्र कथलाचे वाळा, अशी आहे. मुखाने फुले, शाहू, डॉ. आंबेडकर यांचे नाव घ्यायचे. पण प्रत्यक्षात मात्र कामगारांना देशोधडीला लावले जात आहे. आमची राज्य सरकारकडे आग्रहाची मागणी आहे, या बदललेल्या कामगार कायद्याचा सरकारने फेरविचार करावा. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नेहमीच म्हणायचे, 'अन्यायाविरूद्ध चीड उफाळून आली पाहिजे. तरच लढण्याची ताकद निर्माण होईल', तशी एकजूट आज कामगार संघटनांमध्ये निर्माण करावी लागेल. तसेच कामगारांना त्या अनुषंगाने जागरूक करावे लागेल. त्यांच्यामध्ये आपल्या न्याय्य हक्कांची जाणीव करून देणे गरजेचे आहे. त्यानुसार येत्या काळात कार्य करण्याची फार मोठी आवश्यकता आहे.

**मुंबईतील गिरणी कामगारांची समस्या चिंताग्रस्त होऊन बसली आहे. आज त्याचे मूळ कशात आहे?**

गिरणी कामगारांचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारमध्ये 'सकारात्मकता' नाही. हा खरा कळीचा मुद्दा आहे. या प्रश्नावर आमचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री मा. उध्दवजी ठाकरेसाहेबांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. बंद एन.टी.सी गिरण्यांच्या प्रश्नावर ते मध्यस्थी करणार होते. आज १ लाख ७५ हजार गिरणी कामगारांनी अर्ज भरले आहेत. परंतु घरे मात्र इतक्या दीर्घ पल्ल्यात फक्त पंधरा वीस हजार कामगारांना मिळाली, शिवाय गिरण्यांच्या जागेवरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठीही ते सकारात्मक प्रयत्न करणार होते. या सर्व प्रश्नावर मा. उध्दवजी ठाकरेसाहेबांनी तातडीने संबंधिताची सह्याद्री अतिथीगृहात महाआघाडी सरकारच्या वतीने बैठक घेतली होती. परंतु दुर्दैवाने या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्यापूर्वीच त्यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. परंतु विद्यमान सरकारच्या मुख्यमंत्र्यांना गिरणी कामगारांच्या प्रश्नावर प्रातिनिधिक युनियन म्हणून आम्ही तीन निवेदने दिली, पण त्यांनी अद्याप बैठक बोलावलेली नाही. मुंबईचा गिरणी कामगार स्वातंत्र्य लढ्याचा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा खरा शिलेदार राहिला आहे, मात्र आज त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे आणि त्याच्या प्रश्नावर हेळसांडपणा केला जात आहे, यांचे दु:ख होते.

आज अंगणवाडी सेविका, परिचारिका, आशा सेविका, बांध कामगार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सरकारी कंत्राटी कामगार इत्यादी मोठा कामगार वर्ग एकाच जात्यात भरडले जाणारे, दु:खाश्रू ढाळणारे सुपातील दाणे आहेत.अशी वेदना सचिनभाऊ अहिर यांनी बोलून दाखवली.

**आपण उल्लेख केल्याप्रमाणे 'निर्णायक लढ्या'चा नेमका अर्थ काय?**

सरकार सांगून ऐकत नाही, त्यांच्या दयेला पाझर फुटत नसेल, तर हे सरकार आपल्याला बदलावे लागेल, तेव्हा हीच ती वेळ आहे, आपल्याला एकत्र येऊन लढावे लागणार आहे. आपल्या अस्तित्वाचा हा प्रश्न आहे, म्हणून लढावे लागेल. लढल्याशिवाय या देशात काहीच मिळत नाही, अशी वेदना कामगार नेते सचिनभाऊ अहिर यांनी येथे आपल्या मुलाखतीच्या बोलून दाखविली,

**-: मुलाखत :-**
**अनुज केसरकर**

**-: सहकार्य :-**
**काशिनाथ माटल**
**बाळा सावर्डेकर**

---

**साधारणत: ८० च्या दशकात लिहिलेला हा लेख सध्याच्या परिस्थितीत देखील लागू असल्यामुळे कामगार हितासाठी पुनर्मुद्रित करत आहोत.**

# कामगार - संघटित व असंघटित

भारतामध्ये आज मोठ्या प्रमाणात कामगारांमध्ये असंतोष असल्याचे व परिणामी संप व बंद आंदोलने दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. मुंबईच्या गिरणी धंद्यातील अडीच लाख कामगारांचा तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ चाललेला संप हेच त्याचे ढळढळीत उदाहरण होय. वाढत्या महागाईमुळे या कामगारांना आपल्या पगारात सुमारे ३०० रुपये मासिक वाढ मागितली, ती देण्याचे मालकांनी नाकारल्यामुळे हा संप आहे. या संपाच्या इष्टानिष्ठतेचा विचार किंवा मागण्या योग्य आहेत किंवा नाही याबद्दल पुष्कळ उलट सुलट लेख आणि वक्तव्य प्रसिद्ध झाली आहेत. आज महागाई इतकी वाढली आहे की, मुंबई सारख्या शहरात दरमहा १,००० रुपये कमावून कोणालाही आपले कुटुंब चालवणे शक्य नाही. त्यामुळे उद्रेक होणे स्वाभाविक आहे. या उद्रेकाचा पाठपुरावा करणारे अनेक कामगार पुढारी व राजकीय नेते आहेत. पण, याचवेळी देशात जे कोट्यावधी असंघटित कामगार आहेत त्यांच्या परिस्थितीचा विचार करण्यास कोणी फारसे पुढे येत नाहीत ही दुर्दैवी गोष्ट म्हणावी लागेल. म्हणून या लेखात संघटित व असंघटित कामगारांच्या परिस्थितीचा तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

१९८० च्या खाणेसुमारी-प्रमाणे भारताची लोकसंख्या ६९ कोटी आहे. त्यात काम करणाऱ्यांची म्हणजे श्रमिकांची संख्या २६ कोटी आहे. या २६ कोटींपैकी संघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या फक्त दोन कोटी ३० लाख असून बाकीचे सुमारे २४ कोटी श्रमिक असंघटित क्षेत्रात काम करीत आहेत. संघटित क्षेत्रात मोठे कारखाने रेल्वे वाहतूक वगैरे यांचा समावेश होतो, तर असंघटित क्षेत्रात शहरांमध्ये काम करणारे हमाल, वेडी कामगार, हॉटेल कामगार, दुकानातील नोकरवर्ग व खेड्यातील शेतमजूर, बलुतेदार व श्रमिक शेतकरी यांचा समावेश होतो. म्हणजे एकूण श्रमिकांपैकी जेमतेम १०% श्रमिक संघटित क्षेत्रात आहेत. तर काम करणाऱ्या १०० लोकांपैकी ९० लोक असंघटित क्षेत्रात आहेत व त्यांची परिस्थिती काय आहे हे समजून घेणे आवश्यक ठरेल.

१९७८ सालच्या एका पाहणीनुसार भारतामधील संघटित कामगारांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५,७९७ रुपये असल्याचे आढळून आले. तर त्याच पाहणीनुसार देशातील नागरिकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न फक्त १,९१९ रुपये असल्याचे दिसून आले. त्याच काळात शेतमजुराचे सरासरी वार्षिक उत्पन्न जेमतेम दोनशे रुपये होते. मुंबई शहरात आज बँकेतला शिपाई किंवा मोठ्या इंजिनियरिंग कारखान्यात काम करणारा अकुशल कामगार दरमहा १००० रुपयापेक्षा जास्त वेतन कमावतो. त्याचवेळी मुंबई शहरात विडी वळणाऱ्या कामगाराला रोज केवळ १२ रुपये मिळतात. पुणे शहरांमध्ये विडी कामगारांचे वेतन दररोज ८ ते १० रुपये पडते. छोट्या-मोठ्या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांची परिस्थिती तर यापेक्षा वाईट आहे आणि ग्रामीण भागात जे लाखो शेतमजूर काम करतात त्यांचे किमान वेतन आज रोज केवळ ४ ते ५ रुपये इतकेच आहे. या किमान वेतनामध्ये वाढ करून ते अनुक्रमे ६ ते १० रुपये इतके वाढवावे अशी शिफारस शासनाकडे करून तीन महिने झाले पण शासनाने यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही.

संघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा इतर काही सवलती उपलब्ध आहेत. विशेषत गेल्या पन्नास वर्षात संघटित कामगारांनी जी चळवळ केली त्यामुळे या क्षेत्रात नोकरीची शाश्वती जवळ जवळ सर्वत्र उपलब्ध आहे. याखेरीज घरभाडे भत्ता, आजारीपणाची रजा, औषधपाण्याची सोय, बाळंतपणाची रजा, सुट्टीतील प्रवासासाठी सवलत, वगैरे हक्क संघटित कामगारांनी कमावले आहेत. पण असंघटित कामगारांना यापैकी कोणतेही हक्क आज उपलब्ध नाहीत. नोकरीची शाश्वती त्यांना नाही, हॉटेलमधील पोऱ्याला मालक केव्हाही लाथ मारून काढून टाकतो, याची कोणी दाद घेत नाही. विड्या वळण्याचे काम अंगावर असते. मालकाने पुरेशी तंबाखू दिली नाही, पाने कमी दिली तर त्याच्या अगोदरच्या तुटपुंज्या उत्पन्नात कपात होते. शेतमजुरांना तर वर्षातून केवळ १३० ते १५० दिवस काम मिळते व त्याला रोज निरनिराळ्या मालकाकडे कामासाठी फिरावे लागते. असंघटित कामगारांना औषधपाण्याची किंवा घरभाडे भत्त्याची वा कामावर जाण्यासाठी प्रवासभत्याची किंवा वाहनाची कोणतीही सोय नाही. तो आजारी पडला तर त्याने स्वत:च्या खर्चाने औषधपाणी केले पाहिजे व आजारीपणात विना वेतन घरी राहिले पाहिजे. असंघटित कामगारांपैकी महिला प्रसूत झाली तर तिला आपले १० दिवसांचे तान्हे मूल घेऊन कामावर यावे लागते. बांधकाम, रोजगार हमी, शेतमजुरी अशा क्षेत्रांत बऱ्याच महिला आपली तान्ही मुले कामावर घेऊन येतात व ती तेथे मातीत खेळतात. ह्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतिवर होतो. संघटित क्षेत्रांत महिलांसाठी पाळणाघरांची तरतूद आहे. पण मी अनेक विडी कारखान्यांतील स्त्रिया आपली लहान मुले जवळ घेऊन विड्या वळताना पाहिली आहेत. तंबाखूच्या कारखान्यात बालपणापासून वावरणाऱ्या या मुलांना पुढे क्षयरोगाने पछाडले तर आश्चर्य वाटण्यासारखे काय?

आज मुंबई, पुणे, बंगलोर अशा मोठमोठ्या शहरांतील सरकारी व निमसरकारी कारखान्यांत कामावर जाणाऱ्यांना सवलतीच्या दराने कामावर जाण्याची सोय त्या त्या कंपन्यांमार्फत करण्यात येते, पण असंघटित क्षेत्रात व विशेषत: ग्रामीण भागात मजुराला कामावर पोहचण्यासाठी चारचार-पाचपाच किलोमीटर पायपीट करावी लागते. महाराष्ट्रामध्ये रोजगार हमीवर काम करणाऱ्या लक्षावधी कामगारांना रोज किमान चारपाच मैलांची पायपीट केल्यावर

**बा. न. राजहंस**

काम मिळते व तेथेही त्यांना जड श्रमाचे काम करावे लागते जाण्यायेण्यात त्यांचे सुमारे तीन तास जातात व आठतास कामाचे, म्हणजे दिवसाचे ११ तास घालवल्यावर त्यांना रोज जेमतेम ४ ते ५ रु. मिळतात. असंघटित कामगारांचे जीवन म्हणजे नुस्ते कष्ट घाम गाळून अर्धपोटी जगणे होय. असंघटित कामगारांपैकी एक रिक्षा ओढणारांचा वर्ग आहे त्यांचे कष्टाचे जीवन पाहून तर मन बेचैन होते. भारतामधील मोठमोठ्या शहरांमध्ये आज सुमारे १० ते १५ लाख सायकल रिक्षा ओढून आपले जीवन कंठणारे कामगार आहेत. कलकत्त्यांत तर माणसाने बैलाप्रमाणे ओढावयाच्या रिक्षा आहेत. या रिक्षा ओढणाऱ्या कामगाराने रोज जेव्हा आठ ते दहा तास अक्षरश: घाम गाळावा व छातीचा भाता करावा, तेव्हा त्याला जेमतेम १० रु. मिळतात. रिक्षा ओढणाऱ्या बहुतेक कामगारांना वयाच्या ३० व्या वर्षाच्या आसपास क्षय होतो या बहुतेक कामगारांना कोणा ठेकेदाराकडून रिक्षा भाड्याने घ्याव्या लागतात व कामगारांच्या घामावर हे ठेकेदार हजारो-लाखो रुपये कमावतात. या श्रमिकांच्या मालकीच्या रिक्षा व्हाव्यात म्हणून अद्याप संघटित कामगार वर्गाने किंवा शासनाने काही भरीव पाऊले उचललेली नाहीत.

संघटित कामगारांना संरक्षण देणारे, औद्योगिक कलह निवारण कायदा, प्रॉव्हिडंट फंड कायदा, ग्रॅच्युइटीचा कायदा, बाळंतपणाच्या सवलतीचा कायदा, खाणकामगारांचा कायदा, एम्प्लाईज स्टेट इन्शुअरन्स अ‍ॅक्ट असे अनेक कायदे आहेत व या कायद्यांचे संरक्षण त्यांच्या पदरात पाडून देणाऱ्या त्यांच्या युनियन्स व वकील मंडळी आहेत. या कायद्यामध्ये अनेक उणीवा असल्या तरी संघटित कामगारांचे जीवन थोडेतरी सुसह्य व्हावे इतपत या कायद्यांचा फायदा त्यांना होतो.

असंघटित कामगारांना संरक्षण देणारे कायदे फार थोडे आहेत व त्यांची अंमलबजावणी जवळजवळ अभावानेच होते. असंघटित कामगारांना संरक्षण देणारा सर्वांत महत्त्वाचा कायदा म्हणजे किमान वेतन कायदा. या कायद्यानुसार राज्यसरकारला कोणत्याही असंघटित धंद्यातील कामगारांचे वेतनमान ठरविण्यासाठी त्रिपक्षीय कमिटी नेमून वेतनमान ठरवता येते. या कमिट्यांचे आजपर्यंतचे अहवाल पाहिले तर वेतनाचे झुकते माप कधीही कामगाराच्या बाजूचे पडलेले दिसत नाही. महाराष्ट्रात नुकतीच विडी कामगारांच्या किमान वेतनात सुधारणा करण्यात आली तेव्हा विडी कामगाराला मोठ्या उदारपणाने ६ रु. ७५ पैसे वेतन देण्यात आले. जंगलखात्यामधील कामगारांचे किमान वेतन गेल्या वर्षी सुधारण्यात आले तेव्हा त्याना ग्रामीण भागात ६ रु. ६० पैसे व शहरी भागात ८ रु. ७० पैसे मिळतात. शेतमजुरांच्या किमान वेतनाचा उल्लेख वर करण्यात आलाच आहे.

असंघटित कामगारांच्या बाबतीत किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी जवळ जवळ होत नाही. त्यामुळे कायद्याने ठरवलेले किमान वेतन व प्रत्यक्षात मिळणारे किमान वेतन, यांत फार फरक दिसून येतो. शेतमजूर चौकशी आयोगाने केलेल्या पाहणीनुसार १९७४-७५ साली स्त्रियांना मिळणारे प्रत्यक्ष दैनिक वेतन केवळ २ रु. २७ पैसे तर पुरुषांना मिळणारे दैनिक वेतन केवळ ३ रु. २४ पैसे असल्याचे आढळून आले. याच काळात देशात कोठेही शेतमजुरांचे ठरवलेले किमान वेतन ४ रु. पेक्षा कमी नव्हते. किमान कायद्याखेरीज माथाडी कायदा, विडी व सिगारेट असे काही कायदे असंघटित कामगारांसाठी पास झालेले आहेत, पण या कायद्याने अमलबजावणीचे संदर्भात मालक वर्गाने अनेक ठिकाणी कोर्टातून स्थगिती आणल्यामुळे हे कायदे पास होऊन वर्षानुवर्षे झाली तरी त्याची अंमलबजावणी होत नाही व या बाबतीत असंघटित कामगार चळवळ किंवा गरिबांच्या नावाने विधानसभेत निवडून गेलेले आमदार यापैकी कोणीही अद्याप प्रभावी आवाज उठवलेला नाही.

बहुतेक संघटित कामगारांना वृद्धापकाळी प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन किंवा ग्रॅच्युइटी यापैकी एक किंवा जादा फायदे मिळतात व त्यांना वृद्धापकाळी थोडा तरी आधार राहातो. पण असंघटित कामगारांना वृद्धापकाळाची कोणतीही सोय नाही. शरीर थकेपर्यंत काम करावयाचे व थकल्यानंतर कोणी संभाळले तर जगावयाचे, नाहीतर उपाशी रहावयाचे वा भीक मागावयाची असंघटित कामगारावर वेळ येते.

सारांश, भारतात कष्टकऱ्यांच्या सुमारे २४ कोटी असंघटित कामगारांना कामाची शाश्वती नाही. पुरेसे वेतन नाही, सामाजिक सुरक्षिततेच्या सोयी नाहीत. कायद्याचे संरक्षण नाही. अशा भयानक अवस्थेत अर्धपोटी व अर्ध्या वेतनावर राहावे लागते. या लोकांना संघटित करण्याचे काम फार कठीण व किचकट आहे. त्यासाठी माणसे, साधने व पैसा उभा करणे या असंघटित कामगारांना शक्य नाही.

♦ संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण ♦ कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री.एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी 'कर्मचारी टाइम्स' हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.♦ संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९१६५८८, ९५०३५७९५५२ ई मेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com ♦ सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत ♦ (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र.ग.कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

♦ Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employee Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India. ♦ Contact - Editorial : 9890916588, 9821374626 ♦ Advertisement : 9890916588, 9503579552 ♦ Distribution : 9890916588, 9503579552
E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com ♦ All Legal matter subject to Mumbai Jurisdiction